नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २४८ * ✻ अमरावती ✻ मंगळवार, दिनांक ४ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

## यूपीच्या महिलेला यूएईमध्ये फाशी



**■ वृत्तसंस्था, दुबई, दि. ३ :** उत्तर प्रदेशातील बांदा येथील रहिवासी असलेल्या शहजादी खान या महिलेला १५ फेब्रुवारी रोजी यूएईमध्ये फाशी देण्यात आली. परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी दिल्ली उच्च न्यायालयाला ही माहिती दिली.

तिच्यावर ४ महिन्यांच्या मुलाची हत्या केल्याचा आरोप होता. ती २ वर्षे दुबई तुरुंगात होती. चार महिन्यांपूर्वी न्यायालयाने तिला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती. परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल चेतन शर्मा यांनी न्यायालयाला सांगितले की, शहजादीचे अंतिम संस्कार ५ मार्च रोजी केले जातील.

अग्रलेख

## खरीखरी..

## थरूर, काँग्रेसपासून दूर

सध्या भारतातील सर्वात जुना पक्ष राष्ट्रीय काँग्रेसला काय झाले आहे, ते माहीत नाही. देशातील जवळजवळ सर्व राज्यांवर सत्ता गाजवणारी काँग्रेस आता पुन्हा जुने दिवस पाहणार की नाही, अशी शंका काँग्रेस पक्षातील अनेक दिग्गजांना सतावू लागलेली आहे. काँग्रेस मधून अनेक दिग्गज नेते बाहेर पडलेले आहेत. जे जे नेते बाहेर गेले आहेत. त्यांनी आपापल्या राज्यात काँग्रेसला मोठे नुकसान पोहोचवलेले आहे. इकडे भारतीय जनता पक्षामध्ये सर्वपक्षीय नेत्यांचे फुले पसरवून स्वागत होत आहे. आता ताजे उदाहरण शशी थरूर यांचे दिसते. त्यांनी आपल्याला पक्षात काही काम नाही, आपल्याला बोलून दिले जात नाही. अशी तक्रार करून आपल्या मनातील खदखद बाहेर काढली. काँग्रेस श्रेष्ठींच्या मनाविरुद्ध मल्लिकार्जुन खरगे यांच्याविरुद्ध अध्यक्षपदाची निवडणूक लढवून ते पराजित झाले होते. त्यानंतर काँग्रेस पक्षाने केरळ मधून त्यांना तिकीट जरूर दिले. पण निवडणुकीनंतर त्यांचा कुठेही उपयोग करून घेतलेला दिसत नाही. केरळ सारख्या सुशिक्षित राज्यात सतत चार वेळ निवडणूक जिंकणे ही काही साधीसुधी गोष्ट नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर शशी थरूर यांचा डंका वाजत असताना दिवंगत पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्यांना निवडणूक लढण्यासाठी उभे केले. आता स्वतंत्र बुद्धीने विचार करणारा अशा प्रकारचा नेता काँग्रेसला चालत नाही, असे समजावे काय. गेल्या लोकसभा निवडणुकांच्या आधी राहुल गांधी यांनी दोन यात्रा काढल्या. त्यामधील पहिली होती ती भारत जोडो यात्रा आणि दुसरी होती भारत जोडो न्याय यात्रा. राहुल गांधींचे परिश्रम आणि या दोन यात्रांमुळे काँग्रेसला लोकसभेत शंभरी गाठता आली. त्यानंतर इंडियाचे कडबोळे तयार झाल्यावर त्याला आकार देण्याची जबाबदारी विभिन्न कारणांमुळे काँग्रेसला घेता आली नाही. इंडियात राहूनही तृणमूल किंवा आप काँग्रेस बरोबर समरसच झाले नव्हते. या दोन पक्षांनी काँग्रेसचीच मते आपल्याकडे वळवून घेतली. भारतातील सर्वच राजकीय पक्ष काँग्रेसांकित आहेत, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. आज काँग्रेस? सोबत अजूनही पाच-सहा पक्ष मैत्री टिकवून आहेत. पण काँग्रेसची हायकमांड कसे निर्णय घेते, हेच कळत नाही. राहुल गांधी जे बोलतात, ते जनतेला पटते. पण काँग्रेस मधील ढुढ्ढाचार्यांना ते अजिबात पटत नाही. ही मंडळी काही न करता काँग्रेसच्या कार्यालयात कारस्थाने करण्यात मग्न असतात. अशा परिस्थितीत आता थिरुअनंतपुरमचे चार वेळेचे खासदार शशी थरूर काँग्रेसमध्ये राहतील की नाही, हा प्रश्न उभा ठाकलेला आहे. काँग्रेसमध्ये प्रश्न विचारणे, म्हणजे बंडखोरी करणे असे समजले जाते. काँग्रेस मधील अंतर्गत कलह आणि राज्या-राज्यातील गटबाजी काँग्रेसला दिवसेंदिवस कमजोर करीत आहेत. सत्ता नसल्यामुळे काँग्रेस मधून बहिर्गमन करणारे सत्ताधारी पक्षात जाऊन सुख भोगण्यात मग्न आहेत. शशी थरूर यांनी काही दिवसांपूर्वी केरळमधील कम्युनिस्टांच्या सरकारवर चार चांगली वाक्ये बोलली होती. त्यांनी मोदी यांचेही अमेरिकेच्या यात्रेबाबत अभिनंदन केले होते. एकूणच काँग्रेसच्या सध्याच्या संघटनात्मक दुबळेपणाचा फायदा त्याच पक्षातील महत्त्वाकांक्षी लोक घेत असतात. शशी थरूर यांच्या सारख्या विद्वान नेत्याची कदर करणे काँग्रेसला जमले पाहिजे. पण विद्वत्तेच्या आणि हुशारीच्या बाबतीत पासंगालाही न पुरणारे तथाकथित पक्षश्रेष्ठी थरूर यांना महत्त्वाचे कार्य करू देणार नाहीत. थरूर यांनी काँग्रेसचा त्याग करू नये म्हणून त्यांना महत्त्वाची कामगिरी दिली पाहिजे. लवकरच केरळमध्ये निवडणुका होणार आहेत. त्या निवडणुकीत त्याच त्या जुन्या चेहऱ्यांपेक्षा शशी थरूर यांचा उपयोग करून घेतला. तर काँग्रेसला लाभ होऊ शकतो. काँग्रेसने जर लवकरात लवकर याबाबतीत निर्णय घेतला नाही. तर थरूर केरळमध्ये भारतीय जनता पक्षाला चंचुप्रवेश करून देऊ शकतात. एकूणच परिस्थिती पाहता विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची परीक्षा शशी थरूर घेत आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पाहूया! भविष्याच्या पोटात काय दडलेले आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी

# ६,४८६ कोटींची तरतूद

### अर्थमंत्री अजित पवारांची घोषणा



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** महाराष्ट्रात महायुतीचे नवे सरकार स्थापन झाल्यानंतर पहिलंच अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून (३ मार्च) सुरू झाले आहे. आज विधीमंडळात राज्यपालांचे अभिभाषण पार पडले. त्यानंतर अधिवेशनाला सुरुवात झाली.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील घरं, कृषी पंपांना वीजेच्या दरात सवलत व इतर पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भात पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. तसेच राज्यातील विविध प्रकल्पांसाठी निधीची तरतूद जाहीर करण्यात आली.

यावेळी अर्थमंत्री अजित पवार म्हणाले, राज्याच्या कानाकोपऱ्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाला बळकटी देण्यासाठी यंदा एकूण ६,४८६.२० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी निव्वळ भार ४,२४५.९४ कोटी रुपये इतकाच आहे.

अजित पवारांनी यासंदर्भात एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की आजपासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ च्या पहिल्या दिवशी राज्याच्या ग्रामीण भागातील घरं, कृषीपंपांना वीजदरात सवलत, रस्ते विकासाला गती अशा पायाभूत सुविधा आणि लोकहिताच्या योजनांसाठी वर्ष २०२४-२५ च्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर केल्या.

या मागण्यांमध्ये ग्रामीण भागातील नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेतून घरं, कृषीपंप ग्राहकांना वीजदर सवलत, रस्ते व पूल प्रकल्पांसाठी बिनव्याजी कर्जासाठी निधी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना, पुणे रिंग रोड, जालना-नांदेड द्रुतगती महामार्गाच्या कामांना गती, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळासाठी बळीराजा जलसंजीवनी योजना, तसेच शासन अंशदान घटकाखाली विविध प्रकल्पांसाठीचा निधी या सर्वांचा समावेश आहे.

### विधिमंडळ परिसरात विरोधकांची

# जोरदार घोषणाबाजी



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू झाले आहे. राज्यातील दोन मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करतानाच महाराष्ट्राचे दोन गुंडे, एक कोकाटे दुसरे मुंडे, अशी जोरदार घोषणाबाजी केली.

दरम्यान संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि कृषी मंत्री असतांना कृषी विभागातील भ्रष्टाचार प्रकरणावरुन विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला आहे. गेल्या ३ महिन्यापासून विरोधक त्यांचा राजीनाम्याची मागणी करत आहेत. तर कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना एका जुन्या प्रकरणात नाशिक कोटार्ने दोन वर्षाची शिक्षा सुनावली आहे, यामुळे त्यांचाही राजीनामा घ्यावा अशी मागणी विरोधकांनी केली आहे.

विधिमंडळात राज्यपालांचे अभिभाषण सुरू होण्यापूर्वी विरोधक आक्रमक झाल्याचे दिसून आले. यावेळी मविआच्या आमदारांनी दोन गुंडे, एक कोकाटे आणि दुसरे मुंडे, अशी घोषणाबाजी केली. तर दोघांचेही राजीनामे घेण्यात यावे अशी मागणीही त्यांनी केली आहे.

दरम्यान, अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जितेंद्र आव्हाड यांनी हातात हातकड्या घालून अधिवेशनाला हजेरी लावली. राज्यात व देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असून, त्याचा निषेध करण्यासाठी आपण हातात बेड्या घालून येथे आल्याचे ते या प्रकरणी म्हणाले.

या बेड्या कुणाला घालायच्या हे सरकारच्या मनावर आहे. पण सरकार असे काही करेल असे मला वाटत नाही. आता सीआयडीने सर्वच पुढे आणले आहे. पण तो माझा खास माणूस आहे असे कोण म्हणाले होते? मग नैतिकता आहे की नाही? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला.

### विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी

# निवडणूक जाहीर

**२७ मार्च रोजी मतदान आणि मतमोजणी**

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** विधान परिषदेच्या रिक्त झालेल्या ५ जागांसाठी आज निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला. त्यानुसार येत्या २७ मार्च रोजी निवडणूक होणार असून, त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणीला होणार आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राजकीय रस्सीखेच रंगणार आहे.

गत विधानसभा निवडणुकीत आमश्या पाडवी, प्रवीण दाटके, राजेश विटेकर, रमेश कराड, गोपिचंद पडळकर हे विधान परिषदेचे ५ सदस्य विधानसभेवर निवडून गेले. त्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागांसाठी निवडणूक आयोगाने सोमवारी निवडणूक जाहीर केली. त्यानुसार, इच्छुक उमेदवारांना १० मार्च पासून आपले उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. १७ मार्च ही अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर १८ मार्च रोजी दाखल अर्जांची छाननी केली जाईल.

२० मार्च ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर २७ मार्च रोजी सकाळी 9 ते सायंकाळी 4 वाजेपर्यंत निवडणूक होईल. त्यानंतर सायंकाळी ५ वा. लगेचच मतमोजणीला सुरुवात होऊन रात्री उशिरापर्यंत निकाल जाहीर होतील.

यापूर्वी झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यात चांगलीच चुरस दिसून आली होती. त्यामुळे या निवडणुकीतही अशीच चुरस पहावयास मिळण्याची शक्यता आहे. त्याचवेळी कोणत्या पक्षाकडून कोणत्या नेत्याला यासाठी संधी मिळते हे पाहणेही या प्रकरणी महत्त्वाचे ठरणार आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी महायुतीने मनसेला सोबत घेण्याचे संकेत दिलेत. त्यामुळे भाजप विधान परिषदेच्या एका जागेवर मनसेला संधी देणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## अखेर माधवी बुच यांच्यावर गुन्हा दाखल



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** सेबीच्या माजी अध्यक्षा माधवी पुरी बुच व अन्य पाच अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याचा आदेश लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिला आहे.

केंद्र सरकारने आता तरी सेबी मधील घोटाळ्यांच्या मालिकांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, माधवी पुरी बूच यांची संपूर्ण कारकिर्द वादग्रस्त राहिली आहे. त्यांच्यावर सातत्याने घोटाळ्याचे आरोप झाले आहेत. सेबीच्या अध्यक्षपदी असतानाही माधवी पुरी बूच व त्यांचे पती धवल बुच यांनी अदानी घोटाळ्याशी संबंध असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केल्याचा आरोप हिंडेनबर्गने केला होता.

### राज्यात एचएसआरपी नंबरप्लेटचे दर

# इतर राज्यांच्या तुलनेत समान

**फडणवीस यांचा दावा**



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** राज्यात एचएसआरपी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसविण्याचे दर हे इतर राज्यांच्या तुलनेत जवळपास समानच आहेत, काही राज्यांच्या तुलनेत हे दर कमीही आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

आपण जीएसटी आणि फिक्सिंग चार्जेस धरून दर निश्चित केले आहेत, तर इतर राज्यांनी हे शुल्क वगळून दर जाहीर केल्याने महाराष्ट्रातील दर अधिक वाटतात, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आपल्याकडेच सर्वाधिक दर आहेत, या दाव्यात कोणतेही तथ्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

राज्य सरकारने प्रत्येक खात्याला १०० दिवसांचा रोडमॅप दिला असून, त्यानुसार काम सुरू आहे. नुकताच या योजनांचा आढावा घेण्यात आला. या धोरणाचा राज्याला मोठा फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील लोककल्याणकारी योजनांचा अर्थव्यवस्थेवर ताण असला तरी कोणतीही योजना बंद केली जाणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. माझी लाडकी बहीण योजना असो किंवा इतर कोणतीही कल्याणकारी योजना, राज्य सरकार त्यात कोणताही बदल करणार नाही, असेही त्यांनी ठासून सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अज्ञ्र्ह्हाला हलक्यात घेवू नका... या वक्तव्यावरही फडणवीस यांनी कोटी केली.

# 'अनोरा'ला ५ ऑस्कर

**बेस्ट पिक्चर बेस्ट ॲक्ट्रेसचा समावेश**



**■ वृत्तसंस्था, लॉस एंजेलिस, दि. ३ :** ९७ व्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात २३ श्रेणींमध्ये ऑस्कर विजेत्यांची घोषणा करण्यात आली आहे. 'द ब्रुटालिस्ट' चित्रपटासाठी ॲड्रियन ब्रॉडीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा ऑस्कर आणि 'अनोरा' चित्रपटासाठी मिकी मॅडिसनला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा ऑस्कर मिळाला.

या वर्षी, 'अनोरा' चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन, सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट संकलन, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री या श्रेणींमध्ये सर्वाधिक ५ पुरस्कार जिंकले. दुसऱ्या क्रमांकावर, द ब्रुटालिस्ट या चित्रपटाला ३ पुरस्कार मिळाले आहेत.

### २४ लाख मुलांचे प्राण वाचवणारे

# जेम्स हॅरिसन यांचे निधन



**■ वृत्तसंस्था, कॅनबेरा, दि. ३ :** ऑस्ट्रेलियाचे जेम्स हॅरिसन यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. न्यू साउथ वेल्समधील एका नर्सिंग होममध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गोल्डन आर्म म्हणून प्रसिद्ध असलेल्या जेम्स यांनी आयुष्यात ११७३ वेळा रक्तदान करून २४ लाख मुलांचे प्राण वाचवले.

त्यांच्या रक्ताच्या प्लाज्मामध्ये एक दुर्मिळ अँटीबॉडी होती. यातून, रीसस नावाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या गर्भवती महिलांसाठी अँटी-डी नावाचे इंजेक्शन बनवले गेले, जेणेकरून त्यांचे स्वतःचे रक्त त्यांच्या जन्मलेल्या बाळावर हल्ला करू नये. त्यांनी आयुष्यातील ६० वर्षे दर आठवड्याला रक्तदान केले.

जेम्स १४ वर्षांचे असताना त्यांच्या छातीचे ऑपरेशन झाले. यासाठी त्यांना १३ युनिट रक्त देण्यात आले. यामुळे त्यांना स्वतः रक्तदान करण्याची प्रेरणा मिळाली. जेम्स यांनी १९५४ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी रक्तदान करण्यास सुरुवात केली. त्यांनी सुमारे ६० वर्षे रक्तदान केले.

## लातूर-नांदेड महामार्गावर एसटीचा भीषण अपघात

### ३६ जखमी, अनेक गंभीर



**■ वृत्तसंस्था, लातूर दि. ३ :** लातूर-नांदेड महामार्गावर भीषण अपघात झाला. एका दुचाकीला वाचवण्याच्या प्रयत्नात एसटी बस उलटली. या अपघातात ३६ प्रवासी गंभीर जखमी झाले असून ५ जण अंत्यवस्थेत आहेत.

ही दुर्घटना नांदगाव पाटीजवळ घडली. अपघातातील जखमींना तातडीने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या भीषण अपघातात बसमधील ४८ प्रवाशांपैकी ३६ प्रवाशांना जबर मार लागा आहे. त्यापैकी, ५ जणांची प्रकृती गंभीर आहे. या अपघातात दोन प्रवाशांचे हात कोपऱ्यापासून तुटले.

पोलिस व जिल्हा प्रशासनाने अपघाताची दखल घेत मदत व बचावकार्य सुरू केले.

### इतर घोटाळ्यांनाही मुख्यमंत्री

# स्थगिती देतील का?

**पटोलेंचा सवाल**

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** शिंदे सरकारच्या काळातील आरोग्य विभागातील घोटाळ्याच्या चौकशीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित कंत्राटाला स्थगिती दिली. मात्र, आरोग्य विभागाप्रमाणेच इतर विभागांतील घोटाळेबाज कंत्राटांनाही स्थगिती देणार का? असा सवाल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केला आहे.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी भाजप-युती सरकारवर तीव्र टीका केली. या सरकारमध्ये तिघांची तीन तोंडे आहेत. ते केवळ मलई लाटण्यासाठी आणि पालकमंत्री पदांसाठी भांडत आहेत, असे पटोले म्हणाले.

नाना पटोले यांनी राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांवर थेट आरोप करताना सांगितले की, या सरकारमधील ६५ टक्के मंत्री गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. धनंजय मुंडे व माणिकराव कोकाटे यांच्यावर कारवाईची चर्चा होतेय, पण बाकीचे दागी मंत्री कोण? मुख्यमंत्री फडणवीस यांनी खरोखरच धमक असेल, तर त्यांनी सर्व दागी मंत्र्यांवर कारवाई करावी.

शिंदे सरकारच्या काळात आरोग्य विभागाप्रमाणेच अन्न व नागरी पुरवठा, जलसंपदा, बांधकाम आणि कृषी विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. कृषी विभागातील काही घोटाळे आम्ही उघड केले आहेत. मुख्यमंत्र्यांनी सर्व भ्रष्टाचारी फाईलींमध्ये लक्ष घालावे आणि चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, असेही पटोले म्हणाले.

## ५ वर्षीय बहिणीला भावाने संपवले

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** नालासोपारा येथे एका ५ वर्षीय चिमुकलीची तिच्याच १३ वर्षीय आत्येभावाने खून केल्याची घटना घडली. आपल्या लहान बहिणीवरच घरातील सगळे प्रेम करतात, या ईर्षेपोटी ही हत्या करण्यात आल्याचे समजते. १३ वर्षीय भावाने ५ वर्षीय बहिणीचा गळा दाबून व डोक्यात दगड घालून हत्या केली.

मो. सलमान मोहम्मद रमजान (३३) यांची मुलगीअचानक बेपत्ता झाली. परिसरातील सीसीटीव्ही तपासले असता खान यांचा १३ वर्षीय भाचा तिला घेऊन जाताना दिसला. रात्री तिचा मृतदेह सापडला. पोलिसांनी १३ वर्षीय भाच्याची चौकशी केली असता, त्याच्या जबाबात विसंगती आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी अधिक कसून चौकशी केली तेव्हा त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

## आकाश आनंद यांची बसपातून हकालपट्टी

**■ वृत्तसंस्था, लखनौ, दि. ३ :** बसपा प्रमुख मायावती यांनी सोमवारी त्यांचा भाचा आकाश आनंद यांना पक्षातून काढून टाकले. याच्या एक दिवस आधी त्यांनी आकाश यांना पक्षाच्या सर्व पदांवरून काढून टाकले होते आणि ते त्यांचे उत्तराधिकारी नसल्याचेही जाहीर केले होते.

मायावतींनी लिहिले, काल झालेल्या बसपाच्या बैठकीत आकाश आनंद यांना पक्षाच्या राष्ट्रीय समन्वयकासह सर्व जबाबदाऱ्यांपासून मुक्त करण्यात आले. आकाश यांना पश्चात्ताप करून त्यांची परिपक्वता दाखवावी लागली. पण आकाश यांनी दिलेला प्रतिसाद राजकीय परिपक्वता नाही. बसपाच्या सर्व पदांवरून काढून टाकल्यानंतर आकाश आनंद यांनी मायावतींचा प्रत्येक निर्णय माझ्यासाठी दगडावर कोरलेल्या रेषेसारखा असल्याचे म्हटले आहे.

# औरंगजेब उत्तम प्रशासक... अबू आझमींच्या विधानाने वाद



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** मोगल बादशहा औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्याच्यात व छत्रपती संभाजी महाराज यांच्यात धर्माची लढाई नव्हती. उलट त्याच्याच काळात भारताला सोन्याची खाण म्हणून संबोधले जात होते, असा वादग्रस्त दावा समाजवादी पार्टीचे नेते अबू आझमी यांनी केला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रासह देशात मुस्लिमांवर अत्याचार वाढल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

अबू आझमी पुढे बोलताना म्हणाले की, औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्यांच्या काळातच भारताला सोन्याची खान म्हणून संबोधले जात होते. औरंगजेबाची कबर खोदण्याबद्दल बोलणारे भाजप नेते जातीय सलोखा बिघडवत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

अबू आझमीं पुढे म्हणाले, औरंगजेबाच्या काळात भारताची सीमा ही अफगाणिस्तानपर्यंत होती. जीडीपी २४ टक्के एवढा होता. भारताला त्यावेळी 'सोने की चिड़िया', असे म्हटले जात होते. असे असताना चुकीचे म्हणू का? छत्रपती संभाजी महाराज यांच्याबरोबर औरंगजेबची लढाई झाली, ती राज्य कारभाराची होती. छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेबमध्ये कधीच धमार्ची लढाई झाली नाही. मी धर्माची लढाई मानत नाही.

मी दररोज सकाळी पाहतो की मुस्लिमांना अपमानित करण्यासाठी, त्यांना उद्ध्वस्त करण्यासाठी आणि नष्ट करण्यासाठी कट रचले जात असल्याचा आरोप त्यांनी सरकारवर केला आहे. बांगलादेशात हिंदूंवर होणारे अत्याचार दिसत आहे. पण देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री हे मुस्लिमांवर होणारा अन्याय पाहू शकत नाहीत का? जर समाजातील २० टक्के लोकांसोबत हे घडत असेल तर ते अजिबात बरोबर नाही. जर तुम्ही त्यांना आरक्षण दिले नाही, त्यांना रोजगार दिला नाही तर ते कुठे जातील? द्वेषाची ही परंपरा थांबवा, असेही ते म्हणाले.

दरम्यान, अबु आझमी यांनी औरंगजेबाची स्तुती चालविल्याने अनेकांनी त्यांच्याव टीकेची झोड उठविली आहे. हा देशद्रोह असल्यचे सांगत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी महायुतीमधील अनेक नेत्यांनी केली आहे.

# उदात्तीकरण दुर्दैवी : शिंदे



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अबू आझमींवर जोरदार टीका केली. औरंगजेबाचे उदात्तीकरण करणे अतिशय दुर्दैवी आहे. अबू आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करायला पाहिजे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. औरंगजेबाचे कौतूक म्हणजे महापाप आहे, अबू आझमींनी माफी मागावी, असेही शिंदे म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. औरंगजेबाने ४० दिवस छत्रपती संभाजी महाराजांचे हाल करून मारले. या देशासाठी ज्यांनी धर्माभिमान बाळगला, देशासाठी प्राणाचे बलिदान दिले. परंतु, त्यांनी धर्म, राष्ट्राभिमान सोडला नाही. औरंगजेबाचे उदात्तीकरण करणे म्हणजे अतिशय दुर्दैवी आहे. जेवढा याचा निषेध करू, तेवढा कमी आहे, अबू आझमीला देशद्रोहाचा गुन्हा दाखल करायला पाहिजे, अबू आझमींनी केलेले औरंगजेबाचे कौतूक म्हणजे महापाप आहे. अबू आझमी यांनी माफी मागितली पाहिजे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

# कृषिमंत्री कोकाटेंचा राजीनामा केव्हा घेणार?

## अंबादास दानवे यांनी सभागृहात मागितला खुलासा कोर्टाची ऑर्डर आल्यानंतर निर्णय मुख्यमंत्री

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३ :**

मुंबई महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री कोट्यातील घर लाटल्याप्रकरणी २ वर्षांची शिक्षा झालेल्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा केव्हा घेणार? असा सरकारला प्रश्न केला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोर्टाचा आदेश आल्यानंतर या प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्याचे स्पष्टीकरण दिले. पण या प्रकरणी दिरंगाई होत असल्याचा आरोप करत विरोधकांनी मोठा घणाघात केला. नाशिक कोर्टाने गत २० फेब्रुवारी रोजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका खोटी माहिती देऊन लाटल्याप्रकरणी २ वर्षांची कैद व ५० हजार रुपयांच्या आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावली आहे. या शिक्षेमुळे त्यांच्या आमदारकीवर तथा पर्यायाने मंत्रिपदावर गडांतर येणार आहे. पण निकाल येऊन ११ दिवस लोटले तरी अद्याप त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई झाली नाही. यामुळे विरोधक चांगलेच आक्रमक झालेत.

**अंबादास दानवेंनी उपस्थित केला मुद्दा**

आज अधिवेशनाला सुरुवात होताच शोकप्रस्तावापूर्वी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला. राज्याच्या कृषिमंत्र्यांना कोर्टाने २ वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. या शिक्षेला अद्याप कोणतीही स्थगिती मिळाली नाही. नियमाप्रमाणे सदर मंत्र्यावर अपात्रततेची कारवाई झाली पाहिजे. पण या प्रकरणी अद्याप



कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही. सरकारची या प्रकरणी आपली काय भूमिका आहे हे सांगावे, असे ते म्हणाले. यावेळी सभापती राम शिंदे यांनी शोकप्रस्तावाच्यवेळी अशी मागणी करता येत नसल्याचे सांगितले.मंत्री दोन्ही सभागृहांचे असतात असा विरोधकांचा प्रतिवाद त्यावर अंबादास दानवे यांनी शोकप्रस्तावानंतर असे करता येत नसल्यामुळे मी हा प्रस्ताव सादर करण्यापूर्वीच तशी विनंती केल्याची बाब सभापतींच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी सत्ताधारी व विरोधकांत चांगलीच गरमागरमी झाली. त्यानंतर सभापतींनी विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा खालच्या सभागृहाचा (विधानसभा) असल्याचे नमूद करत हे प्रकरण पुढे रेटण्याचा प्रयतक केला. पण विरोधकांनी मंत्री कोणत्याही एका नव्हे तर दोन्ही सभागृहांचे असतात असे अधोरेखित करत त्यांना खिंडीत पकडण्याचा प्रयतक केला. कोर्टाची ऑर्डर आल्यानंतर निर्णय घेणार - फडणवीसत्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यात हस्तक्षेप करत कोर्टाच्या आदेशानंतर या प्रकरणी योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले. देशाचे दिवंगत माजी पंतप्रधान तथा ज्येष्ठ नेते, ज्यांनी या देशामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक सुधारणा केल्या अशा मनमोहन सिंग यांच्या शोकप्रस्तावावेळी असा गोंधळ होईल असे वाटले नव्हते. तथापि माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, आपण मंत्रिमहोदयांविषयी जे काही मांडले आहे, त्यावर कोर्टाने सुनावणी पूर्ण केली आहे. क्लोज फॉर ऑर्डर ठेवली आहे. कोर्टाची ही ऑर्डर आल्यानंतर सभागृह किंवा राज्यपाल या प्रकरणी योग्य तो निर्णय घेतील, असे ते म्हणाले.

# राज्यात लाखांहून अधिक रोजगार संधी राज्यपालांचा विश्वास

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३ :**

महाराष्ट्र सरकारने जानेवारी मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत लाख हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सामंजस्य करार केले आहेत. यामुळे राज्यात लाखांहून अधिक रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सोमवारी व्यक्त केला.

औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आणि रोजगार संधी वाढवण्यासाठी राज्य सरकारने हजार कोटी रुपयांचे प्रोत्साहन अनुदान वितरित करण्याचे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

**विकसित महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेने सरकारची वाटचाल**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात राज्यपालांच्या अभिभाषणाने झाली. गेल्या वर्षभरातील सरकारच्या योजना आणि उपक्रमांचा आढावा घेताना, शेतकरी, महिला, दुर्बल घटकांचे सक्षमीकरण, आरोग्य, रोजगार, उद्योग आणि पायाभूत सुविधांसाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र हा सर्वसमावेशक, प्रगतीशील आणि विकसित राज्य करण्यासाठी सरकार कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**नागपूरमोवा शक्तिपीठ द्रुतगती मार्गास शेतकऱ्यांचा विरोध**

नागपूर-गोवा दरम्यानच्या शक्तिपीठ द्रुतगती मार्गाला कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विरोध असताना, सरकारने हा प्रकल्प हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा मार्ग प्रमुख धार्मिक स्थळे आणि तीर्थक्षेत्रे जोडेल, प्रवासाचा वेळ कमी करेल आणि आर्थिक विकासाला चालना देईल, असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च हजार कोटी रुपये असल्याचे त्यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय**

राज्य सरकार कृषी क्षेत्रातील संधी वाढवण्यासाठी विविध योजना राबवते आहे.

मागेल त्याला सौर पंप योजना अंतर्गत लाख हजार सौर पंप बसविण्यात आले असून पुढील पाच वर्षांत लाख सौर पंप बसवण्याचे लक्ष्य आहे.प्रधानमंत्री-कुसुम आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत राज्यातील सर्व कृषी वाहिन्या सौरऊर्जाकृत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजना अंतर्गत लाखांहून अधिक शेतकऱ्यांची निवड करण्यात आली, तसेच लाख शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड सुविधा देण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात हजार कोटी रुपये पीक कर्ज वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, आतापर्यंत हजार कोटी रुपये वितरित झाले आहेत.

**रस्ते विकास आणि सीमाप्रश्न सोडवण्याचा निर्धार**

राज्यातील रस्ते टिकाऊ करण्यासाठी आणि जोडणी सुधारण्यासाठी किमी सिमेंट-काँक्रिट रस्ते बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राचे प्रभावी प्रतिनिधित्व करण्यासाठी तज्ज्ञ वकील नेमण्यात आले आहेत. सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांसाठी शैक्षणिक, वैद्यकीय आणि कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत. राज्य सरकारच्या या महत्त्वाच्या योजनांमुळे रोजगार वाढ, कृषी विकास, औद्योगिक प्रगती आणि पायाभूत सुविधांचा विकास होईल, असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

# इतिहासकार इंद्रजित सावंतांवर गुन्हा दाखल करा

## करनी सेनेने दाखल केली पोलिसांत तक्रार

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३ :**

इतिहासकार इंद्रजित सावंत हे आपल्या यूट्यूब चॅनेलद्वारे चुकीची माहिती पसरवतात. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जावा, अशी मागणी करनी सेनेचे अध्यक्ष अजय सिंह सेंगर यांनी केली आहे. त्यांनी यासंबंधी खान्देश्वर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

इतिहासकार इंद्रजित सावंत यांना काही दिवसांपूर्वी कथित पत्रकार प्रशांत कोरटकर यांनी जिवे मारण्याची धमकी दिली होती.

त्यांनी यासंबंधी कोल्हापूर पोलिसांत तक्रार दाखल करत यासंबंधीची ऑडिओ क्लिप जाहीर केली होती.

त्यानंतर प्रशांत कोरटकर यांनी या क्लिपमधील आवाज आपला नसल्याचे सांगितले होते. या वादामुळे महाराष्ट्राचे राजकारण गाजत असताना आता करनी सेनेने इंद्रजित सावंत यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

**ब्राह्मण, राजपूतद्वेषी विधाने करण्याचा आरोप**

करनी सेनेचे अध्यक्ष अजयसिंह



सेंगर यांनी या प्रकरणी खान्देश्वर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ते आपल्या तक्रारीत म्हणाले की, इतिहासकार इंद्रजित सावंत हे ब्राह्मण व राजपूत यांच्याविरोधात यूट्यूब चॅनेलद्वारे चुकीची माहिती पसरवतात. ते परदेशी लेखकांनी लिहिलेल्या इतिहासाचा दाखला देत वारंवार या दोन्ही समाजांविरोधात विधाने करतात. याद्वारे ते समाजात दुही पिकवत असल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जावा.

दुसरीकडे, इंद्रजित सावंत यांना धमकावल्याप्रकरणी प्रशांत कोरटकर यांच्यावर सोशल मीडियातून टीकेची झोड उठली आहे. तकाही जणांनी त्यांना धमकीही दिली आहे. त्यामुळे कोरटकरच्या पतकीने नागपूरच्या बेलतरोडी पोलिस ठाण्यात याविषयी तक्रार दाखल केली आहे.

**फरार कोरटकरचा व्हिडिओ व्हायरल**

उल्लेखनीय बाब म्हणजे फरार प्रशांत कोरटकर याचा व्हिडिओ रविवारी रात्री व्हायरल झाला. त्याने या प्रकरणाबाबत कुठलीही माफी मागितली नाही.

पण छत्रपती शिवाजी महाराजांवर स्तुतीसुमने उधळली आहेत. छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यामुळे महाराष्ट्राला जगभरात ओळखले जाते.

त्यांच्या कथा ऐकून मी लहानाचा मोठा झालो.

त्यांच्या कथा अजूनही प्रेरणा देतात. छत्रपतींची राजधानी असलेल्या रायगडला मी अनेकदा अनेकदा भेट दिली व नतमस्तक झालो.

त्यांना मी मानाचा मुजरा करतो, असे कोरटकरने व्हिडिओत म्हटले आहे.

दरम्यान, कोरटकरचा व्हिडिओ हा एखाद्या कार्यालयातील दिसून येत आहे. तो व्हिडिओ काही पत्रकारांपर्यंत पोहोचवण्यात आला.

आता पोलिस हा व्हिडिओ कुठून व्हायरल झाला? याची चौकशी किती वेगाने करतात का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# सोमनाथ सूर्यवंशींना न्याय द्या आझाद मैदानावर आंदोलक आक्रमक

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३ :**

परभणी प्रकरणातील सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळवा यासाठी मुंबई येथील आझाद मैदानात सुरू असलेले आंदोलन काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात करण्यात येत असून आझाद मैदानातून बाहेर पडण्याचा प्रयतक आंदोलकांकडून केला जात आहे. मंत्रालयात हे आंदोलक जाणार असल्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र यावेळी गेट बंद करण्यात आल्याने आंदोलकांकडून घोषणाबाजी करण्यात आली. आझाद मैदानात सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा यासाठी आंदोलन सुरू होते. यावेळी विजय वडेट्टीवार यांनी आंदोलकांची भेट घेतली. तसेच त्यांनी आंदोलकांशी संवाद साधला. आझाद मैदानातून विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात आंदोलक मंत्रालायकडे जात असताना पोलिसांनी गेट बंद केले असून बाहेरच्या बाजूने देखील बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. यावेळी माध्यमांशी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, हे सरकार घाबरून आहे. जनतेचा सामना करू शकत नाही म्हणून पोलिसांना इथे उभे करून हे काम करत



आहेत. या सरकारला अधिवेशनात धडा शिकवणार.

अधिवेशनात आम्ही हा मुद्दा मांडणार आहोत. तसेच सरकारला आम्ही जाब विचारणार आहोत. सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला असून जेवढे पोलिस यात होते त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे व फाशीची शिक्षा झाली पाहिजे. हा सोमनाथ सूर्यवंशीचा आणि विजयचा खून आहे. पोलिस कोठडीत असताना हा खून झाला आहे. याचे उत्तर सरकारला द्यावे लागणार आहे. दरम्यान, विजय वडेट्टीवार यांच्यासोबतच आंदोलक आझाद मैदानातून बाहेर पडण्याचा प्रयतक करताना दिसले. सकाळपासून आझाद मैदानावर आंदोलकांनी हे आंदोलन सुरू केले होते. काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांनी देखील सकाळी आंदोलकांची भेट घेतली होती. त्यानंतर विजय वडेट्टीवार यांनी आंदोलकांची भेट घेऊन याठिकाणी त्यांनी भाषण देखील केले. यावेळी मंत्रालयात चालून जाणार असल्याचा इशारा आंदोलकांनी दिला होता.

# मुंबई महानगरपालिकेच्या परीक्षेत मोठा घोटाळा? गट 'अ'चा पेपर फुटल्याचा आरोप

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३ :**

बीएमसीच्या परीक्षेत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या परीक्षेचा पेपर फुटला असून एक-एक प्रश्न १० लाखांना विकला गेल्याचा दावा करण्यात आला आहे. या घोटाळ्याच्या चौकशीची मागणी करण्यात आली आहे. चौकशी होईपर्यंत या परीक्षेचा लावू नये अशीही मागणी करण्यात आली आहे. आता हे प्रकरण राज ठाकरे यांच्यापर्यंत पोहोचले आहे. राज ठाकरे लवकरच या संबंधित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याधी बोलणार असल्याचे मनसे नेते संदीप देशपांडे यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या गट अ खात्यात नियुक्तीसाठी २५ फेब्रुवारी रोजी परीक्षा पार पडली. ही परीक्षा आयबीपीएसमार्फत घेण्यात आली होती. परंतु, १९ फेब्रुवारी रोजी या परीक्षेचा पेपर फुटल्याचा आरोप करण्यात येत आहे. परीक्षेत कोणते प्रश्न येणार यासंदर्भातील माहिती पुरवल्याचा आरोप ५०० हून अधिक अभियंत्यांनी केला आहे. महानगरपालिकेच्या गट अ च्या ज्या परीक्षा होत्या, त्यात साधारणपणे १२०० लोकं बसली होती. जो पेपर २५ तारखेला होणार होता. तो पेपर आधीच १९ तारखेला फुटला. आमच्या माहितीप्रमाणे या प्रश्नपत्रिकेतील एक एक प्रश्न दहा दहा लाखाला विकला गेला. शेकडो कोटींचा घोटाळा या परीक्षेच्या माध्यमातून झाला. घोटाळेबाज असे इंजिनियर तुम्ही पालिकेला देणार आहात का? असा सवाल मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. एकदा हे पैसे देऊन इंजिनियर झाले, की नंतर हे पैसे खाण्याचेच काम करतील. यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे ही आमची मागणी आहे. राज ठाकरे यांना आम्ही पूर्ण प्रकाराची कल्पना दिलेली आहे. लवकरच राज ठाकरे मुख्यमंत्री देवेंद्र




फडणीस यांची भेट घेऊन त्या विषयावरती बोलणार आहेत, अशी माहिती संदीप देशपांडे यांनी दिली. या घटनेत परीक्षा रद्द झाली पाहिजे आणि चौकशी झाली पाहिजे. जे दोषी आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे ही आमची ठाम भूमिका असल्याचे संदीप देशपांडे म्हणाले. राज ठाकरे मुख्यमंत्र्यांना भेटून रितसर तक्रार देणार आहेत. देवेंद्र फडणीस यांच्याकडे आम्ही कारवाईसाठी जाऊ. त्यांनी कारवाई नाही केली तर आम्ही आमच्या पद्धतीने कारवाई करू, असा इशाराही संदीप देशपांडे यांनी दिला.

**हा विषय राज ठाकरेंकडे गेला, तर न्याय मिळेल**

माझ्याकडे हे प्रकरण आले, तेव्हा तक्रार केली. त्यादिवशी एक मोठा गट आम्हाला येऊन भेटला. हा विषय राज ठाकरे यांच्याकडे पोहोचावा, अशी त्यांची अपेक्षा होती. हा विषय त्यांच्याकडे गेला तर त्यांना न्याय मिळेल. काही लोकांनी प्रामाणिकपणे परीक्षा दिलेली आहे. त्यांना न्याय मिळावा म्हणून राज ठाकरे यांच्याकडे आम्ही आलेलो आहोत.

संदीप देशपांडे आणि मी साहेबांकडे आमचे मत मांडले. ते सीएम साहेबांशी बोलणार आहेत, असे मनीष धुरी म्हणालेत.

# ठाकरे -फडणवीसांत जवळीक वाढली? राऊतांच्या भावाला मानाचे पान

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३ :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज दणक्यात सुरुवात झाली. विधानसभेत पहिल्या दिवशी केवळ शोकप्रस्ताव सादर करण्यात आला, पण विधानपरिषदेत मात्र कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या मुद्यावरून थोडीशी गरमागरमी झाली. तत्पूर्वी, शिवसेनेतील फुटीनंतर प्रथमच ठाकरे गटाच्या नेत्याला त्यातही विशेषतः खासदार संजय राऊत यांच्या बंधूंना तालिका अध्यक्ष म्हणून मानाचे पान देण्यात आले. यामुळे उद्धव ठाकरे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात जवळीक वाढत असल्याची चर्चा रंगली आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या



तालिका अध्यक्षांच्या नावांची घोषणा केली. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील राऊत यांना तालिका अध्यक्षपदाची संधी देण्यात आली. सुनील राऊत हे ठाकरे गटाची मुलुख मैदानी तोफ मानले जाणारे खासदार संजय राऊत यांचे बंधू आहेत. त्यामुळे त्यांना ही संधी दिल्यामुळे राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सूत्रांच्या मते, हे उद्धव ठाकरे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातील वाढत्या जवळीकतेचे द्योतक असल्याचेही संकेत आहे.

**वरुण सरदेसाई मुख्यमंत्र्यांच्या भेटीला**

दुसरीकडे, ठाकरे गटाचे आमदार तथा आदित्य ठाकरे यांचे विश्वासू वरुण सरदेसाई यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. त्यांनी मतदारसंघातील विकासकामांसाठी ही भेट घेतल्याचे सांगितले. पण सरदेसाई असो किंवा संजय राऊत हे दोघेही ठाकरे कुटुंबीयांच्या जवळचे आहेत. त्यामुळे सरदेसाईंची मुख्यमंत्र्यांशी झालेली भेट व सुनील राऊतांना मिळालेले मानाचे पान हे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

**चंद्रकांत पाटलांनी ठाकरेंच्या आमदारांची घेतली भेट**

उल्लेखनीय बाब म्हणजे भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी पुन्हा एकदा ठाकरे गटाच्या आमदारांना चॉकलेट भेट देऊन त्यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. त्यांनी स्वतः विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या दालनात जाऊन ठाकरे गटाच्या नेत्यांची भेट घेतली. यावेळी दानवे व आदित्य ठाकरे यांच्यासह भास्कर जाधव, अनिल परब यांच्यासह काँग्रेस नेते सतेज पाटीलही उपस्थित होते. यामुळेही भाजप व ठाकरे गटातील दुरावा मिटत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दरम्यान, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावेळी उद्धव ठाकरे यांनी स्वतः देवेंद्र फडणवीस व विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली होती. यावेळी विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद ठाकरे गटाला देण्याची चर्चा रंगली होती. त्यानंतर आता या चर्चेला मूर्त रुप येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महापुरुषांचा अवमान करणाऱ्या विरोधात राज्य सरकारने कडक कायदा आणावा अमोल मिटकरींची मागणी

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३**

अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्वात प्रामुख्याने मुद्दा हा शेतकऱ्यांच्या समस्या संदर्भात असणार आहे. तसेच अलीकडच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे यांच्या बद्दल गरळ ओकणारी प्रवृत्ती निर्माण झाली आहे. यात राहुल सोलापूरकर असो किंवा प्रशांत कोरटकर असो. अशा प्रवृत्तीला चाप लावण्याकरता, कठोर कायदा करून त्यांना तात्काळ जेल बंद करावे, अशी मागणी आपण अधिवेशनात करणार असल्याचे आमदार अमोल मिटकरी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. या वेळी मिटकरी यांनी प्रशांत कोरटकर यांचाही चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले की, प्रशांत कोरटकरने दिलगिरी व्यक्त न करता, माफी न मागता, एखादा चोर डल्ला टाकल्यानंतर स्वतःला उजागर समजतो. त्या पद्धतीने वर्तन केले आहे. ते खपवून घेतले जाणार नसल्याचे मिटकरी यांनी म्हटले आहे. मोबाईल जप्त केला आणि माझा आवाज नसल्याचा दावा त्याचा असला तरी पोलिसांनी त्याचाच आवाज असल्याचे सिद्ध केले आहे. त्यामुळे अशा प्रकारे महापुरुषांचा अवमान करणाऱ्या विरोधात राज्य सरकारने कडक कायदा आणावा, यासाठी मुख्यमंत्र्यांना विनंती करणार असल्याचे मिटकरी यांनी म्हटले आहे. याच विषयावर अर्धा तास चर्चा होणार असल्याची माहिती देखील मिटकरी यांनी दिली आहे.

# मी १०० टक्के रायगडचा पालकमंत्री होणार मंत्री भरत गोगावले यांचा विश्वास

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३ :** मी १०० टक्के रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री होणार, असा आत्मविश्वास शिवसेनेचे आमदार आणि मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केला. ते आज विधानभवनात माध्यमांशी बोलत होते. कुणीतरी बालहट्ट सोडावा, बालहट्ट सोडला तर एका मिनिटात निर्णय होईल, असा टोलाही आदिती तटकरे यांना नाव न घेता लगावला. सरकारकडून पालकमंत्र्यांची घोषणा केल्यानंतर आदिती तटकरे यांच्याकडे रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद गेले होते.

परंतु, यामुळे शिवसेनेचे आमदार भरत गोगावले नाराज झाले. त्यानंतर सरकारने रायगडच्या पालकमंत्री पदाच्या नियुक्तीला स्थगिती दिली होती. तेव्हापासून हा तिढा कायम आहे. शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्री पदावर दावा केला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसही या



जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदासाठी दावा सांगत आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. आज भरत गोगावले यांनी केलेल्या दाव्यामुळे तीन महिन्यांपासून रखडलेला रायगड जिल्ह्याचा पालकमंत्रिपदाचा वाद लवकरच सुटण्याची शक्यता आहे. रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत नक्कीच तोडगा निघेल, असा विश्वास शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांनी व्यक्त केला. रायगडच्या पालकमंत्रिपदाचा चेंडू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोर्टात टाकला आहे. त्यावर तिघे जण बसून तोडगा काढतील, असेही ते म्हणाले.

मी १०० टक्के रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री होणार, आम्ही एक टक्का पण कमी नाही बोलत, असा आत्मविश्वास गोगावले यांनी यावेळी व्यक्त केला. पालकमंत्री पदाच्या निर्णयाबाबत संध्याकाळपर्यंत वाट पाहावी, तेव्हा सगळे समजेलच, असेही ते म्हणाले. कुणीतरी बालहट्ट सोडावा, बालहट्ट सोडला तर एका मिनिटात निर्णय होईल, असा टोलाही आदिती तटकरे यांना नाव न घेता लगावला.

**फडणवीस, तटकरे, गोगावलेंचा एकाच गाडीतून प्रवास**

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल रायगड जिल्हा दौऱ्यावर होते. यावेळी त्यांच्याबरोबर शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील होते. या दोघांनी सुरुवातीला महाड येथील चवदार तळ्याला भेट दिली. त्यानंतर पुढील कार्यक्रमाला जाताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री भरत गोगावले आणि मंत्री आदिती तटकरे यांना एकाच वाहन घेत प्रवास केला. हा प्रवास चर्चेचा विषय ठरला होता. या प्रवासात रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत चर्चा झाली असणार, असा अंदाज बांधला गेला होता.

त्यानंतर महाडमधील दिवाणी न्यायालयाच्या कोनशिला समारंभानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पालकमंत्रिपदाच्या तिढ्याबाबत विचारले असता मी, एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे तिघे रायगडचे पालकमंत्री आहोत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. यावरून पालकमंत्री पदावर अजून तोडगा निघाला नसून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या जोरदार रस्सीखेच सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# ठाकरे गटाला विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद? काँग्रेसचा पाठिंबा : राष्ट्रवादीला उपाध्यक्षपद?

■महासागर प्रतिनिधी

**मुंबई, दि. ३** आजपासून राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शिवसेनेच्या ठाकरे गटाने विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदावर दावा सांगितला आहे.

महाविकास आघाडीतील प्रमुख घटकपक्ष असणाऱ्या काँग्रेसने ठाकरे गटाच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पण त्याचवेळी ठाकरे गटाकडे असणाऱ्या विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदावर आपला दावा सांगितला आहे. त्यामुळे विरोधी बाकावरील या मित्र पक्षांना आपसात तोडगा काढवा लागणार आहे. दरम्यान, सत्ताधारी महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला विधानसभेचे उपाध्यक्षपद येणार असल्याचा दावा केला जात आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सोमवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदावर दावा सांगितला. विधानसभेत विरोधी पक्षनेता नसेल तर भ्रष्टाचार बोकाळतो. अनेक राज्यांत ५ सदस्य असले तरी विरोधी पक्षाला विरोधी पक्षनेतेपद दिले जाते. ही परंपरा आहे. महाराष्ट्रात विरोधी पक्षांचे एकूण ५० आमदार आहेत. त्यातही आमच्या पक्षाचे सर्वात जास्त आमदार आहेत. त्यामुळे हे पद आम्हालाच मिळाले पाहिजे, असे संजय राऊत म्हणाले. ठाकरे गटाकडून या पदासाठी आमदार भास्कर जाधव, सुनील प्रभू व आदित्य ठाकरे यांच्या नावाची चर्चा आहे. त्यातही भास्कर जाधव यांच्या नावाला सर्वाधिक पसंती दर्शवली जात असल्याचा दावा केला जात आहे. दुसरीकडे, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ठाकरे गटाला विरोधी पक्षनेतेपद देण्यास अनुकूलता दर्शवली. विधानसभेत ठाकरे गटाचे संख्याबळ जास्त आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचा विरोधी पक्षनेता बनेल. विधानपरिषदेत काँग्रेसचे संख्याबळ जास्त आहे. त्यामुळे तिथे आमचा



विरोधी पक्षनेता बनेल. ज्यांचे संख्याबळ जास्त त्यांना नेतेपद हे सूत्र आहे. त्यामुळे यात वाद घालण्यासारखे काहीच नाही, असे ते म्हणाले. पत्रकारांनी यावेळी त्यांना तुम्ही विधान परिषदेतील ठाकरे गटाचे विद्यमान विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना हटवण्याची मागणी करत आहात का? असा प्रश्न केला. त्यावर नाना पटोले म्हणाले की, हा हटवण्याचा प्रश्न नाही. विधिमंडळाचे जे नियम असतात त्या आधारावर आम्ही मागणी करत आहोत, असे ते म्हणाले. काँग्रेसच्या या मागणीमुळे अंबादास दानवे यांचे विरोधीपक्षनेतेपद जाणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

**विधानसभेचे उपाध्यक्षपद राष्ट्रवादीला**

दरम्यान, विधानसभेचे उपाध्यक्षपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विधानसभा व विधान परिषदेचे अध्यक्षपद भाजपच्या ताब्यात आहे. त्यामुळे हे पद राष्ट्रवादीला मिळेल असा दावा केला जात आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादीने अनुसूचित जाती प्रवर्गाला (एससी) न्याय देण्यासाठी या पदासाठी माजी मंत्री राजकुमार बडोले यांचे नाव फिक्स केल्याचेही सांगितले जात आहे.

मास्यांच्या वासाने केला घात ...

# धावत्या दुचाकीवर झेप घेत वाघाने युवकाची केली शिकार?



## जामली, खोंगडा, अंबापाटीमध्ये दहशत

जंगलाने वेढलेल्या जामलीआर, खोंगडा व अंबापाटी या गावांमध्ये आल्यादिवशी बिबट व अस्वलीचा शिरकाव असतो, मात्र वाघाची भीती कमीच होती. रात्रीच्या अंधारात मोटरसायकलवर हल्ला करुन एखाद्या व्यक्तीला ठार केल्याची ही पहिलीच घटना मानल्या जात आहे. या गावांमध्ये गहू काढणीचे कामे सुरु असल्याने शेतशिवारांमध्ये 'जागलं'(शेतात चौकीदारी करित जागणे) केल्या जात आहे. अश्यातच खोंगडा येथील घटनेने शेतकऱ्यांमध्ये वाघाची प्रचंड दहशत पसरली असल्याचे सांगितल्या जात आहे.

## मोटरसायकल आढळल्याने शोध

आज सकाळी आमचे वनरक्षक प्रदीप धांडे व कर्मचारी जंगल वस्तीवर असताना त्यांना एक मोटरसायकल दिसून आली यावरून त्यांना संशय आला. त्यांनी शोध घेतला असता वन खंड क्रमांक 952 मध्ये खोंगडा बीट अंतर्गत विनोद छोटेलाल चिमोटे (वय 35 रा. केली) या युवकाचा मृतदेह आढळून आला. त्याच्या शरीराचा भाग वन्य प्राण्याने खाल्लेला असावा, असे दिसून आले. वैद्यकीय तपासणी अहवाल आल्यानंतर त्याच्या नातेवाईकांना मोबदला देण्यात येईल. पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी अभय चंदेल यांनी दिली.

## जामली ते खोंगडा मार्गावर थरार





**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा, ( दि.3 )** – ग्राम जामलीआर येथे बाजारात मासे विक्री करुन आपल्या गावी मोटरसायकलने परतत असलेल्या एका युवकावर दबा धरुन बसलेल्या वाघाने झेप त्याची शिकार केली. ही घटना रविवारी (दि.3 मार्च) रोजी परतवाडा ते धारणी मार्गावर खोंगडा येथे घडली. धावत्या दुचाकीवर वाघाने झेप घेवून शिकार केल्याची ही मेळघाटातील पहिलीच घटना आहे. माश्यांच्या वासामूळे या वाघाने पाठलाग करुन या युवकाची शिकार केली असावी असा कयास लावल्या जात आहे.

विनोद छोटेलाल चिमोटे (35, रा. केली, ता. चिखलदरा), असे वाघाच्या हल्ल्यात ठार झालेल्या युवकाचे नाव आहे. विनोद याचा मासेविक्रीचा व्यवसाय होता. विनोद हा काल जामली आर येथे मासे विकण्यासाठी आला होता. काल रात्री आठ ते नऊच्या सुमारास एमएच 27 / बीजे 9059 क्रमांकाच्या मोटरसायकलने तो आपल्या गावाकडे केली येथे परत जात असताना वाघाने त्याच्यावर हल्ला केला, त्यात त्याचा मृत्यू झाला.चिखलदरा तालुक्यातील खोंगडा बीट अंतर्गत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. त्याचा मृतदेह रात्रभर मुख्य रस्त्यापासून अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर जंगलात पडून होता. त्याच्या शरीराचे लचके वाघाने तोडल्याचे स्पष्टपणे दिसून आले. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना आज सकाळी त्याचा मृतदेह आढळला. वनविभागाचे कर्मचारी सकाळी जंगल गस्तीवर असताना त्यांना रस्त्यावर मोटरसायकल दिसली. यावरून त्यांना संशय आला. नंतर त्यांनी शोध सुरू केला. काही अंतरावर जंगलामध्ये युवक मृतावस्थेत दिसून आला. त्यांनी याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली तसेच चिखलदरा पोलिसांना दिली.त्यानंतर विभागीय वन अधिकारी यशवंत बहाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी अभय चंदेल, चिखलदराचे पोलीस निरीक्षक प्रशांत मसराम यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेहाची पाहणी केली. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## दुचाकीच्या मडगार्टवर पगमार्क



या घटनेमध्ये मृतक विनोद चिमोटे याच्या दुचाकीच्या पुढील मडगार्टवर वाघाचे पगमार्क दिसत असल्याचे जाणवत आहे. मात्र ते वाघाचे पगमार्कच असल्याचा दुजोरा अद्याप वनविभागाकडून प्राप्त झाला नाही.

## वर्षभरात तीन घटना



वर्षभरात वाघाच्या हल्ल्याच्या तीन घटना घडल्या आहेत. या तिनही घटनांमध्ये साधर्म्य आहे. त्यामूळे हा प्रकार एकाच वाघाने केला असावा अशी शक्यता आहे. मी वनविभागाला सूचना केल्या की, असे असेल तर वाघाला लवकरात लवकर ट्रॅक करुन त्याला जंगलाच्या अतिसंवेदनशील भागात सोडावे. तसेच ज्या ज्या उपाययोजना करता येईल, त्या-त्या उपाययोजना कराव्यात. मी मृतदेहाची पाहणी केली. या वाघाने सदर युवकाची नरडी फोडून पुढील व पार्श्वभाग खाल्ल्याचे आढळून आले. या मृतकाच्या कुटूंबाला वनविभागाकडून तातडीची मदत म्हणून पाच लाख रुपये देण्यात आले. 20 लाख रुपयांची मदत या मृतकाला मिळावी अश्या सूचना वनविभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या आहे.

**बळवंत वानखडे, खासदार लोकसभा अमरावती.**

# शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ

## दोन दुकानांना केले टार्गेट

**महासागर प्रतिनिधी**

**चादूर रेल्वे,( दि.3 )** – शहराचा अमरावती बायपास मार्गालगत असणाऱ्या संताबाई यादव नगर चौकात रामदेव टाईल्स अँड मार्बल आणि जानकी किराणा दुकानात मोठी चोरी झाल्याचे उघडकीस आले आहे.

चोरीची ही घटना सीसीटीव्ही कॅमेर्या मध्ये कैद झाली असून चोराने चेहरयावर स्कार्फ बांधला आणि त्याच्या हातात हँडग्लोज घातला असल्याचे दिसून येते.

चोरीची घटना ही मध्यरात्री 3 ते 4 दरम्यान घडली असून या दोन्हीही दुकानाचे मालक रितेश राजेश मुंदडा यांच्या तक्रारीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये किती माल चोरी गेला हे अद्याप कळू शकले नाही.

# जबरी चोरी, घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक

**अमरावती, ( दि.3 )**– जबरी चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यातीन दोन आरोपींना यवतमाळातून अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाला यश मिळाले. पंकज राजू गोंडाणे (28, रा. चवरे नगर, अमरावती) व सागर जनार्धन गोगटे (34, रा. गांधी चौक, तुळजागीरवाडा, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी फ्रेजरपूरा हद्दीतील सराफ ले-आउट येथील जबरी चोरी व राजापेठ हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

# कर्मवीरांच्या समर्पण आणि सेवेला सलाम!

## 4 मार्च : लाइनमन दिवस





**मोहम्मद अजहरुद्दीन**

**अचलपूर,( दि.3 )** – दरवर्षी 4 मार्च रोजी लाइनमन दिवस साजरा केला जातो. हा दिवस त्या मेहनती कर्मचाऱ्यांना समर्पित आहे, जे विजेच्या अखंड पुरवठ्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतही अहोरात्र कार्यरत असतात. वादळ, पाऊस किंवा कडाक्याची थंडी असो, हे कर्मवीर आपल्या जिवाची पर्वा न करता समाजाची सेवा करतात.

आधुनिक जीवन पूर्णपणे वीजेवर अवलंबून आहे. वीज नसल्यास उद्योग, रुग्णालये, शाळा आणि दैनंदिन जीवन ठप्प होऊ शकते. अशा परिस्थितीत लाइनमन आणि वायरमॅन हे खरे हिरो असतात, जे वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतात. ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती, नवीन कनेक्शन जोडणे आणि देखभालीची जबाबदारी ते निभावतात. लाइनमन यांच्या योगदानाशिवाय आधुनिक जीवन शक्यच नाही. 4 मार्च हा दिवस त्यांचे योगदान स्मरणात ठेवण्यासाठी आणि त्यांच्या हक्क व सुरक्षिततेसाठी आवाज उठवण्यासाठी उत्तम संधी आहे. आपण सर्वांनी या कर्मवीरांचा योग्य सन्मान करत, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

### जोखमीचे कार्य

लाइनमन यांचे कार्य अत्यंत धोकादायक असते. अनेकदा त्यांना उंच टॉवरवर चढून, उच्च दाबाच्या विजेच्या तारा दुरुस्त कराव्या लागतात. किंचितशी चूक त्यांच्यासाठी जीवघेणी ठरू शकते. तरीदेखील, हे वीर कधीही आपल्या जबाबदारीपासून पळ काढत नाहीत.

### सुरक्षा उपकरणे

लाइनमन यांना सेफ्टी बेल्ट, हेल्मेट, इन्सुलेटेड हातमोजे आणि बूट यांसारखी सुरक्षा साधने अनिवार्यपणे उपलब्ध करून द्यावीत. विमा आणि आरोग्य सुविधा- त्यांच्यासाठी योग्य विमा योजना व आरोग्य सुविधा अधिक सक्षम केल्या जाव्यात. सन्मान आणि वेतन या कर्मचाऱ्यांना उचित वेतन मिळावे आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी शासन स्तरावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.



# प्रशांत कोरटकर विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा!

## शिवसन्मान मोर्चात शिवभक्तांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.3 )** – छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांचा अपमान करणाऱ्या नागपूर येथील प्रशांत कोरटकर याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याच्याविरोधात कठोर कारवाई करावी या मागणीसाठी आज अमरावतीत शिवसन्मान मोर्चा काढण्यात आला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही गट, शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि संभाजी ब्रिगेडसह विविध संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले.

अमरावती शहरातील पंचवटी चौक येथून या मोर्चाला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती स्वार असणारा ट्रॅक्टर सर्वात समोर होता. इर्विन चौक येथे मोर्चात सहभागी काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर, डॉ. सुनील देशमुख, दर्यापूरचे शिवसेनेचे आमदार गजानना लवटे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) शहर अध्यक्ष प्रशांत डवरे यांच्यासह अनेकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. यानंतर मोर्चा गर्ल्स हायस्कूल चौकातून समोर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धडकला.

### कोरटकरच्या पुतळ्याला चपलांचा हार



मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धडकल्यावर मोर्चाला जाहीर सभेचं स्वरूप आलं यावेळी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला सभा मंचाचं रुप देण्यात आलं. यावेळी या मंचावर प्रशांत कोरटकर यांच्या पुतळ्याला चपलांचा हार घालण्यात आला. काही कार्यकर्त्यांनी कोरटकारचा पुतळा खाली ओढला आणि त्याला चपलांनी तुडवला.

## राष्ट्रपुरुषांचा अपमान महाराष्ट्र सहन करणार नाही



छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज अशा राष्ट्रपुरुषांचा अपमान हे सरकार वेळोवेळी सहन करत असेल. मात्र महाराष्ट्र हा प्रकार सहन करणार नाही अशी प्रतिक्रिया यावेळी काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. कोरटकरसह राहुल सोलापूरकरवर देखील गुन्हा दाखल करावा. या लोकांच्या आर्थिक चौकशी देखील व्हायला हव्यात. हे लोक गाड्या घेऊन कसे फिरतात यांच्याकडे इतकी संपत्ती कशी येते असा सवाल देखील यशोमती ठाकूर यांनी केला. महाराष्ट्रात दुफळी निर्माण करण्याचं मोठं कारस्थान होत आहे. हे कारस्थान महाराष्ट्र सहन करणार नाही. कोटकर आणि सोलापूरकर हे कोणाचे निकटवर्तीय आहेत हे सर्वांना ठाऊक आहे. या दोघांना अटक व्हावी. कोटकर कुठे फिरत आहे हे पोलिसांना ठाऊक आहे. हे लोक खोटा इतिहास पुढं आणण्याचा प्रयत्न करत असून बहुजनांचा अपमान कोणी सहन करणार नाही असं देखील यशोमती ठाकूर म्हणाल्या.

# जबरी चोरी, घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक

## गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 ची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )** – जबरी चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यातीन दोन आरोपींना यवतमाळातून अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाला यश मिळाले. पंकज राजू गोंडाणे (28, रा. चवरे नगर, अमरावती) व सागर जनार्धन गोगटे (34, रा. गांधी चौक, तुळजागीरवाडा, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी फ्रेजरपूरा हद्दीतील सराफ ले-आउट येथील जबरी चोरी व राजापेठ हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

राजापेठ पोलिस ठाण्यात भाष्करराव किसनराव हागे (73, रा. गोकूल कॉलनी, एकवीरानगर, अमरावती) यानी तक्रार दिली होती की, 3 जानेवारी रात्री 12 ते सकाळी 7 वाजतादरम्यान त्यांच्या अंगणातील अॅक्टीवा मोपेड वाहन व घराच्या बेडरुममधील 20 हजाराची रोख चोराने लंपास केली. या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदवून तपास सुरु केला होता. सदर गुन्हाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 करीत होते. दरम्यान गुप्त माहिती व तात्रिंक विश्लेषनावरून या गुन्ह्यात रेकॉर्डवरिल गुन्हेगार पंकज राजू गोंडाणे व सागर जनार्धन गोगटे यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 1 मार्च रोजी दोन्ही आरोपींना यवतमाळ येथून अटक केली. त्यांच्या ताब्यातून गुन्हातील 50 हजार रुपये किमंतीचे अॅक्टीवा वाहन क्रमांक एमएच 27 एएच 7562 जप्त करण्यात आली.

सदर गुन्हाच्या तपासात आरोपींनी फ्रेजरपूरा येथील सराफ ले-आउट येथे रात्रीच्या वेळी खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून एका महिलेसह त्यांच्या आईला चाकूचा धाक दाखवून जबरी चोरीचा गुन्हा केल्याचेही निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी गुन्हातील 29 ग्रॅम सोन्याचे दागिने (किमंत अंदाजे 2 लाख 10 हजार) जप्त केला आहे.


### आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 चे अधिकारी व अमंलदार सराफ ले-आउट येथील जबरी चोरीच्या गुन्ह्याचा सातत्याने तपास करीत होते. पोलिसांनी सराफ लेआऊट परिसरातील सिसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहीतीचे आधारे कुख्यात रेकॉर्डवरिल गुन्हेगार पंकज राजू गोंडाणे याला निष्पन्न केले. पोलिस त्याचा बरेच दिवसापासून शोध घेत होते. दरम्यान आरोपी व त्याचा साथीदार याना यवतमाळ ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून आणखी गुन्हे उघड येण्याची शक्यता आहे.

# ट्रकची मोपेडला धडक; एक ठार, एक जखमी

## राम मेघे कॉलेज रोडवरील घटना







**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.3 )** – बडनेरा पोलिस ठाणे हद्दीतील राम मेघे महाविद्यालय रस्त्यावर ट्रकने मोपेडला धडक दिली. त्यामध्ये मोपेड वाहन ट्रकच्या चाकात अडकले. या घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला. तर दुसरा गंभीर जखमी झाला. ही घटना सोमवारी सकाळी 9.30 वा. घडली.

संदीप सुमन धिमन (32, माताफैल, बडनेरा, अमरावती) असे मृताचे नाव आहे. रामभाऊ शंकरराव मनोहरे असे जखमीचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, मृत संदीप धिमन हे त्यांच्या कुटुंबातील सदस्य रामभाऊ मनोहरे यांच्यासह महामार्गावर राम मेघे महाविद्यालयाजवळ एमएच 27/बीडी 6797 क्रमांकाच्या दुचाकीने जात होते. यावेळी पाठीमागून येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच16/सीई 9987 च्या चालकाने भरधाव वेगात व बेदरकारपणे वाहन चालवत संदीप यांच्या अॅक्टिव्हाला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की संदीपची दुचाकी ट्रकच्या टायरमध्ये अडकली. या अपघातात संदीप धिमन यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. रामभाऊ मनोहरे हे गंभीर जखमी झाले आहेत. बडनेरा पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. संदीपचा मृतदेह जिल्हा रुग्णालयातील शवागारात पाठवण्यात आला आहे. रामभाऊ मनोहरे यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# त्या लबाडी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची होणार पोलीस चौकशी


## चांदूर बाजार न्यायालयाने दिले आदेश | गोपाल भालेराव यांच्या तक्रार अर्जावर झाली सुनावणी

*महासागर प्रतिनिधी*
*चांदूर बाजार( दि.3 )- खोटे कागदपत्रे सादर करून घरभाडे घेणाऱ्या काही लबाड शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची खैर नाही. कारण न्यायालयाने थेट अशा कर्मचाऱ्यांची पोलीस चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहे. याप्रकरणी गोपाल भालेराव यांनी न्यायालयात आपला तक्रार अर्ज सादर केला होता. या अर्जावर सुनावणी करत न्यायालयाने हा निर्णय सुनावला आहे.*




तालुक्यातील ग्रामसेवक शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी हे आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी मुख्यालयीन राहण्यासाठी ग्राम पंचायत कडून ग्रामसभेचा ठराव घेणे बंधनकारक आहे. मात्र बनावटी ठराव व इतर कागदपत्रे सादर करून घरभाडे घेणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कारवाई व्हावी अशी मागणी लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांनी केली होती. मुख्यालयी न राहणारे कर्मचारी आपण मुख्यालय असल्याची शासनाला बनावटी कागदत्र शासन दसरी जमा करून शासनाच्या कोट्यावधी रुपयांची अफरातफर करीत आहेत.

या सर्व गोष्टीची दखल घेऊन लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांनी या प्रकरणाचा छडा लावून त्यांनी शासन दप्तरी जमा केलेले खोटे कागदपत्र जमा केले. शासनाची हे कर्मचारी कशाप्रकारे दिशाभूल करीत आहेत याचा भंडाफोड केला. या सर्व गोष्टीचा प्रशासन दरबारी पाठपुरवठा केल्यावरसुद्धा कोणत्याच प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे त्यांनी संबंधित सर्वच कर्मचाऱ्यांच्या विरोधात पोलीस स्टेशन चांदूरबाजार येथे गुन्हा दाखल करण्याकरिता पुराव्यानिशी तक्रार दाखल केली होती.



मात्र पोलिसांनीही संबंधित कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल न करता प्रकरण थंड बस्त्यात ठेवले होते. अखेर गोपाल भालेराव यांनी न्यायालयात दाद मागितली असता न्यायालयाने गोपाल भालेराव यांनी न्यायालयात सादर केलेल्या पुराव्याची शहानिशा केल्यावर कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची व शासन निर्णयाचा अभ्यास करून सदर कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करावे असे आदेश दिले. त्यामूळे अश्या लबाड लोकसेवकांची पोलीसांकडून चौकशी होणार असल्याने अश्या कर्मचारी, अधिकाऱ्यांची घाबरगुंडी उडाली आहे.

> मी हे सदर प्रकरणाचा सातत्याने चार वर्षापासून पाठपुरवठा करत असून शेवटी न्यायालयाने न्याय दिल्याचा मला आनंद असुन शासनाची व जनतेच्या पैशाची लूट करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल होऊन त्यांना योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे व खोटे कागदपत्र सादर करून लाटलेला घर भाडे भत्ता सुद्धा शासनाने त्यांच्याकडून वसूल करून शासन दरबारी जमा केला पाहिजे
>
> **गोपाल भालेराव,**
> **संस्थापक अध्यक्ष**
> **लोकविकास संघटना.**



# अंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाचा पदग्रहण सोहळा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि. 3 )-** येथील अंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाचा पदग्रहण सोहळा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील राज दरबार हॉटेलमध्ये नुकताच उत्साहात पार पडला.

अंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाच्या माध्यमातून पदाधिकारी व सदस्यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी या गटाची स्थापना करण्यात आली आहे.

बचत गटाच्या प्रत्येक सदस्यांना आपल्या व्यवसायासाठी फायदा व्हावा, त्याचबरोबर भविष्यात एखादा मोठा उद्योग उभारून त्यामधून चांगल्या पद्धतीने नियोजन करता येईल, यासाठी हा बचत गट कार्यान्वित करण्यात आला. बचत गटाच्या आमसभेमध्ये आता सदस्यांना सुरुवातीलाच 50 हजार कर्ज मिळेल व त्याचबरोबर पुढील आमसभेपर्यंत एवढीच रक्कम देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

बचत गटाचे अध्यक्षांना कर्ज पुरवठा समितीचे अध्यक्ष करण्यात आले. सदस्य म्हणून अनिल पडिया, राहुल पालेकर, विजय देवानी, हेमंत श्रीवास्तव या सर्वांची निवड आमसभेत एकमताने करण्यात आली. पदग्रहण सोहळ्याला पुरुष बचत गटाचे सदस्य मयुर डहाके, ऋषिकेश गुल्हाने, सचिन देशमुख, स्वप्निल मनवर, नितेश झा, भुषण रडके, आकाश लादे, प्रतिक रोहणकर, ऋषिकेश पावडे, राहुल शर्मा, रूपेश फसाटे, शशांक नागरे, महेश चौधरी, महेश सबनिस, सोहेल खान आदींची उपस्थिती होती.

### पाच वर्षाकरिता कार्यकारिणीची निवड

अंबानगरी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर पुरुष बचत गटाच्या नवनिर्वाचित कार्यकारणीमध्ये अध्यक्ष निलश्याम चौधरी, उपाध्यक्ष राहुल पालेकर, सचिव मनीष जगताप, सहसचिव गजानन अंबाडकर, कोषाध्यक्ष प्रशांत टाके, कार्यकारिणी सदस्य अनिल पडीया, राजेश वाडेकर, संदीप पाटील, निखिल तिवारी, अक्षय इंगोले, अंकुश राऊत यांचा समावेश करण्यात आला आहे.

# अंजनगाव बारीत वरळी-मटका व अवैध धंद्यांना उधाण

## बडनेरा पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.3 ) -** अंजनगाव बारी परिसरातील आठवडी बाजार, चावडी चौक भागात वरळी-मटका व्यवसायाला उधाण आले असून या भागातील सामाजिक वातावरण त्यामुळे प्रदूषित झाले आहे. वरळी-मटका आणि अन्य अवैध व्यवसायांमुळे गावातील सर्वसामान्य नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बडनेरा पोलिसांना याबाबत जाणीव असूनही अवैध व्यवसायांकडे पोलिसांकडून हेतूपूरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे.



अंजनगाव बारी येथे आठवडी बाजार व चावडी चौक हे वर्दळीचे ठिकाणे आहेत. येथे अधिक ग्राहक लाभत असल्याने वरली-मटका व्यवसायीकांनी याच परिसरात आपले अवैध धंदे सुरु केले आहे. पोलिसांच्या संगणमतातून हे गैरकायदेशिर व्यवसाय सुरु असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आठवडी बाजार परिसरात कनिष्ठ महाविद्याल, प्राथमिक आरोग्य केंद्र, दुर्गा देवी मंदिर, मरामाय माता मंदिर अशी महत्वाची ठिकाणे आहेत. अवैध व्यवसाय करणारे व्यावसायिक आणि त्यांच्या ग्राहकांमुळे या भागात असामाजिक तत्वांची गर्दी असते. त्याचा नाहक त्रास सर्वसामान्य नागरिकांना सोसावा लागत आहे. अनेक विद्यार्थीही या अवैध धंद्यांना बळी पडत असून त्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील 10, 11 व 12 या इयत्तेचे काही विद्यार्थी वरळी-मटका या जुगाराकडे आकर्षित होताना दिसत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. अंजनगाव बारी येथे पुर्वी वरळी-मटका जुना बस स्टँड भागात चालत होता. तेथील नागरिकांनी गुन्हे शाखेच्या पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर संबंधित व्यवसायिकाने आपला ठिय्या आता आठवडी बाजार परिसरात मांडला आहे. बडनेरा पोलिसांचया संगनमतातून अंजनगावात अवैध धंदे सुरु असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. आठवडी बाजार परिसरात बीट जमादार व अन्य पोलिस कर्मचारी हजर असताना सर्रास हे व्यवसाय सुरु असतात पण पोलिस त्याकडे हेतूपूरस्सर दुर्लक्ष करित असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. याबाबत आता पोलीस आयुक्त यांनी दखल घेउन गावातील वरळी मटका आणि अन्य अवैध धंद्यांना आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# तिवसा न. पं. विषय समित्यांवर काँग्रेसचे वर्चस्व

## बांधकाम सभापतीपदी प्रिया विघ्ने | अमर वानखडे आरोग्य समितीचे सभापती

**महासागर प्रतिनिधी**
**तिवसा,( दि.3 ) -** तिवसा नगर पंचायतच्या विषय समितींच्या सभापतीपदांवर काँग्रेसने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. बांधकाम सभापतीपदी प्रिया विघ्ने तर आरोग्य सभापतीपदी अमर वानखडे यांची निवड झाली आहे. पंचायतच्या विषय समिती सभापतींची निवडणूक आज सोमवारी नगर पंचायतच्या वीर शहीद सचिन श्रीखंडकर सभागृहात पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये पिठासीन अधिकारी अप्पर जिल्हाधिकारी विवेक जाधव, मुख्याधिकारी शिवदास मुसळे, अधीक्षक रोहन राठोड यांच्या उपस्थितीत निवडणूक घेण्यात आली.

यावेळी स्थायी समिती सभापतीपदी विद्यमान नगराध्यक्ष योगेश वानखडे, बांधकाम समिती सभापती उपाध्यक्ष प्रिया नरेंद्र विघ्ने, पाणीपुरवठा सभापतीपदी किसनराव मुंदाने, आरोग्य स्वच्छता समिती सभापतीपदी अमर वानखडे, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी प्रतिभा हरिदास भगत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड एक वर्षासाठी असून महाराष्ट्र नगरपंचायत औद्योगिक नगरी अधिनियम अंतर्गत विषय समितीच्या निवडणुका झाल्या.



काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनात विद्यमान सदस्यांनी या निवडणूक प्रक्रियेत भाग घेतला. प्रशासनाने ही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडली. यावेळी डॉ. राजीव ठाकूर, वैभव वानखडे, मुकुंद देशमुख, दिलीप काळबांडे, सेतू देशमुख सुनील बाखडे, प्रमोद देशमुख, माजी नगरसेवक नरेंद्र विघ्ने, दिवाकर भुरभुरे यांनी नवनिर्वाचित सभापतींचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व नगरसेवक तथा नगरसेविका उपस्थित होते.

# डॉ. अमन अग्रवाल यांना अमेरिकेतील विद्यापीठाची पीएचडी

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.3 )** - धामणगाव रेल्वे येथील युवा वैज्ञानिक डॉ. अमन राजेंद्र अग्रवाल यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित एरिझोना विद्यापीठातून %ऑप्टिकल सायन्स% या विषयात आचार्य पदवी प्राप्त केली असून वैज्ञानिक क्षेत्रात एक नवा मानदंड त्यांनी स्थापित केला आहे.



आपल्या संशोधनादरम्यान त्यांनी प्रकाशकी (ऑप्टिक्स) आणि फोटोनिक्स या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या संशोधनाचे वैज्ञानिक वर्तुळात मोठ्या प्रमाणात कौतुक होत असून या क्षेत्रात नवीन संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. विद्यापीठात शिक्षण घेत असताना डॉ. अमन यांनी अनेक आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक परिषदांमध्ये सहभाग घेतला आणि विविध संशोधन पत्रे प्रकाशित केली. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीयांकडून हा अभिमानाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया देण्यात आली आहे. अमन अग्रवाल यांनी भविष्यात विज्ञानाच्या क्षेत्रात भरीव कार्य करावे अशा सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे भारतातील युवा वैज्ञानिकांना प्रेरणा मिळेल आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्राला नवी दिशा मिळेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# संच मान्यतेच्या निर्णयाविरोधात शिक्षक सेनेचे धरणे आंदोलन

## शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर निदर्शने

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.3 ) -** राज्य सरकारने 15 मार्च 2024 ला घेतलेला संचमान्यतेचा निर्णय शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक असून तो तात्काळ रद्द करण्यात यावा, यासह अन्य प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने अमरावती येथे शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात सहभागी झालेल्या शिक्षकांनी सरकारच्या विरोधात तीव्र निदर्शने केली.



संच मान्यतेचा निर्णय रद्द करावा, 2005 पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, वाढीव टप्पा अनुदान तात्काळ देण्यात यावे या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांच्या आदेशावरून आणि शिक्षक सेनेचे अध्यक्ष रुपेश टाले, अनिल कोल्हे, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राजनकर यांच्या नेतृत्वात धरणे देण्यात आले. संच मान्यतेच्या निर्णयामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांची भवितव्य अंधकारमय होणार आहे. मराठी माध्यमाच्या अनेक खाजगी शाळा, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा व ग्रामीण भागातील अनेक वस्ती शाळा या निर्णयामुळे बंद होणार आहेत. त्याचा फटका हजारो शिक्षकांना बसून त्यांच्या नोकरीवर गदा येणार आहे. सहावी ते आठवी च्या वर्गात 20 पेक्षा कमी विद्यार्थी असतील, तर त्या शाळेत एकही विषय शिक्षक पद मंजूर होणार नाही, असा हा निर्णय असून तो एकूणच शिक्षण व्यवस्थेसाठी घातक ठरणार आहे, असा आरोप शिक्षक सेनेने केला. मुख्याध्यापकांची पदे अतिरिक्त करण्याच्या निर्णयाला देखील शिक्षक संघटनेने विरोध दर्शविला असून हा निर्णयही रद्द करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात अनिल कोल्हे, राजाभाऊ राजनकर, रुपेश टाले, प्रवीण वाटाणे, श्रीकांत देशमुख, उमाकांत जीरापुरे, संजय फड, कवाने, दीपक धांडे, विष्णू आडे, महादेव आदटराव, धनंजय चाटे यांच्यासह शिक्षक सेनेचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मोर्शीत माळी समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक

## सकल माळी समाज जागृती अभियान

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी ,( दि.3 )-** सकल माळी समाज राजकीय जागृती अभियानाअंतर्गत माळी समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक रविवारी मोर्शी येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सकल माळी समाज ऋणानुबंधचे जेष्ठ संघटक सुरेश टवलारे हे होते. यावेळी समाजभूषण श्रीकृष्ण बनसोड यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले.



महात्मा ज्योतिराव फुले आणि राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी बोलताना श्रीकृष्ण बनसोड म्हणाले की, समाजाच्या विकासाचा मार्ग हा सत्तेच्या खुर्चीतून जातो. तेव्हा माळी समाजातील युवा पिढीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्ष कोणताही असो उमेदवारी प्राप्त करून सत्तेत शिरण्यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

यावेळी सर्व शाखीय माळी समाज ऋणानुबंधचे संघटक व पत्रकार अंबादास सिनकर यांचा वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ तसेच %विद्रोही महात्मा% हे पुस्तक देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. सेवाभावी संघटक रवींद्र साबळे यांच्या ज्येष्ठ भगिनी सौ. सुरेखा मधुकर वर्हेकर यांचे दु:खद निधन झाले. त्याबद्दल त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्रा. एन. आर. होले, वसंतराव भडके, पत्रकार अजय पाटील, सुरेंद्र भोजने, सुरेश केंडे, दिनेश उमप आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# उबाठाचे शिवसैनिक कर्जमाफीसाठी मोर्चा काढणार

## अचलपूरच्या मेळाव्यात निर्धार

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.3 ) -** महायुती सरकारने निवडणुकीच्यावेळी राज्यातील शेतकऱ्यां ना कर्जमाफी देण्याचे वचन दिले होते. मात्र सत्तेत आल्यानंतर त्यांनी याबाबतीत डोळेझाक करण्याचे धोरण अवलंबिले आहे. हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर अन्याय असल्याचा आरोप करित शेतकरी कर्जमाफीसाठी अमरावती जिल्ह्यात मोठे आंदोलन करण्याची घोषणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केली आहे. अमरावती येथे 25 हजार शिवसैनिक व शेतकऱ्यां च्या उपस्थितीत मोठा मोर्चा काढण्याचा निर्धार पक्षाने केला आहे.






अचलपूर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा नूकताचा पार पडला. रविवारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आयोजित या मेळाव्यात शिवसेना उपनेते आणि आमदार नितिन देशमुख यांनी मार्गदर्शन केले. संघटन मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला आणि पदाधिकार्यां ना सक्रिय राहण्याच्या सूचना दिल्या. यावेळी आमदार नितिन देशमुख यांनी सांगितले की, शिवसेना ही नेहमी जनतेच्या सेवेसाठी उभी राहणारी संघटना आहे. त्यामुळे प्रत्येक गावात शाखा प्रमुख आणि बूथ प्रमुख असणे आवश्यक आहे. जेव्हा जनता अडचणीत, संकटात असते तेव्हा मदतीसाठी शिवसेनेचा कार्यकर्ता धावून जातो, असे ते म्हणाले. शिवसेना उपनेत्यांनी स्पष्ट केले की, जे पदाधिकारी पक्षासाठी सक्रिय काम करत नाहीत, त्यांनी स्वत:हून पद सोडावे आणि कार्यक्षम व्यक्तींना संधी द्यावी.यावेळी आमदार गजानन लवटे यांनी शिवसैनिकांना संबोधित करताना सांगितले की, मी केवळ दर्यापूरचा आमदार नाही, तर संपूर्ण जिल्ह्यातील शिवसैनिकांचा आमदार आहे. तसेच प्रशासनाकडून प्रत्येक शिवसैनिकाला न्याय मिळवून देण्यासाठी मी पूर्ण ताकदीने उभा राहीन, असेही ते म्हणाले. जिल्हा प्रमुख पराग गुळदे आणि नरेंद्र पडोळे यांनी अचलपूर आणि चांदूरबाजारमध्ये मोठ्या प्रमाणावर शिवसेनेचा पदाधिकारी मेळावा कधीही झाला नव्हता. असे सांगितले. आमदार नितिन देशमुख यांच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाल्याचे ते म्हणाले. या मेळाव्याला महिला आघाडी संपर्क प्रमुख प्रतिभा बोपशेट्टी, जिल्हा प्रमुख पराग गुळदे, नरेंद्र पडोळे, उपजिल्हाप्रमुख आशिष वाटाणे, समन्वयक अभिजित काळमेघ, अचलपूर तालुका प्रमुख अश्विन नागे, चांदुर बाजार तालुका प्रमुख शैलेश पांडे, अचलपूर शहर प्रमुख गजानन फिसके, शहर प्रमुख (परतवाडा) सागर वाटाणे यांच्यासह लक्ष्मी शर्मा, सृष्टी वाघमारे, कपील देशमुख, नरेश तायवाडे तसेच याशिवाय उपतालुका प्रमुख, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख, शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.


### जाहीर सूचना

सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की,ग्रामपंचायत कार्यालय वाघोडा तालुका नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती येथील वार्ड क्रमांक 3 मधील खाली जागा ही मारूती उकंडा मंडवधरे यांच्या स्वत:च्या

मालकीची आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा वारस मुलगा साहेबराव मारुती मंडवधरे यांच्या मालकीची ही जागा आहे. याबाबत कोणाची हरकत असल्यास सात दिवसाच्या आत हरकत नोंदवावी. सात दिवसानंतर त्याजागेबाबत कुणाचीही हरकत नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर सदर जागेची नोंद जागा मालक साहेबराव मारुती मंडवधरे यांच्या नावे ग्रामपंचायत वाघोडा येथे नोंद करण्यात येईल. सबब सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी.

**निवेदक :** साहेबराव मारुती मंडवधरे
**दिनांक :** 4/3/2025
**ठिकाण :** वाघोडा




पुथान नादुवक्कट चेंथमराक्ष मेनन उर्फ पीएनसी मेनन हे प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारे आणि बेंगळुरू येथील रिअल इस्टेट कंपनी 'शोभा डेव्हलपर्स' चे संस्थापक. त्यांचे सुरुवातीचे जीवन आर्थिक संघर्षांनी भरलेले होते. त्यामुळे त्यांना पैशाची किंमत समजली. मूळचे केरळचे असलेले मेनन आपल्या तारुण्यात केवळ ५० रुपये खिशात घेऊन एका मार्गावर निघाले. त्यानंतर आज ते २३ हजार कोटी रुपयांच्या साम्राज्याचे मालक बनले आहेत.**

# कष्टाने युवक बनला कोट्यधीश

अचिव्हर

कठीण काळात हार पत्करणे आणि नशिबाला दोष देणे हा सर्वात सोपा पर्याय आहे; परंतु मेनन ही अशी व्यक्ती आहे, ज्याने आपल्या वाईट काळातही असे काही केले, की त्यांचे यश लोकांसाठी एक उदाहरण बनले. आपल्या परोपकारी प्रयत्नांतून आणि कामाची बांधिलकी याद्वारे ते जगभरातील उद्योजक आणि तरुणांना प्रेरणा देत आहे. त्यांचे जीवन कठोर परिश्रम आणि दृढनिश्चयाची सत्य कथा आहे.


मेनन हे केरळमधील पालघाट येथे आपल्या कुटुंबासह राहत होते. मेनन यांचा संघर्ष बालपणात सुरू झाला. वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर कुटुंबावर आर्थिक संकटांचा डोंगर कोसळला. प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना खूप संघर्ष करावा लागला. ते अभ्यासात हुशार होते; पण आर्थिक अडचणींमुळे कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ शकले नाहीत. परिणामी त्यांना बी.कॉम.चे शिक्षण सोडावे लागले.

मेनन यांनी कोणतेही व्यावसायिक शिक्षण न घेता इंटिरिअर आणि डिझायनिंगचे काम करण्यास सुरुवात केली. स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी त्यांनी सतत मेहनत घेतली. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला मेनन यांनी लाकडी फर्निचर बनवणारी एक छोटी कंपनी सुरू केली. एकदा व्यवसायाच्या संदर्भात, ते कोचीनमधील एका हॉटेलमध्ये ओमानच्या सल्तनतच्या सैन्यातील कॅप्टन सुलेमान अल अदावीशी भेटले. अडवी केरळमध्ये बोट खरेदी करण्यासाठी आले होते. फर्निचर बनवणाऱ्या तरुण मेननच्या कामामुळे ते प्रभावित झाले आणि त्यांनी त्यांना ओमानमध्ये व्यवसाय सुरू करण्यास सुचवले.

मेनन १९९५ मध्ये भारतात परतले आणि बंगळुरूमध्ये शोभा डेव्हलपर्स सुरू केली. त्यांनी या कंपनीचे नाव पत्नी शोभा यांच्या नावावर ठेवले आहे. आज कंपनीची एकूण संपत्ती अंदाजे २३ हजार कोटी रुपये आहे आणि ती देशातील सर्वात मोठ्या रिअल इस्टेट कंपन्यांमध्ये गणली जाते. औपचारिक पदवी आणि व्यावसायिक ज्ञान नसतानाही, त्याच्या मेहनतीमुळे कंपनी दिवसेंदिवस वाढत गेली.

आयुष्यात अनेक वेळा अपयशाला सामोरे जावे लागते; परंतु याचा अर्थ असा नाही, की निराशा हे अपरिवर्तनीय सत्य मानले पाहिजे. कठीण प्रसंगात हसणाऱ्या माणसाला जगातील कोणतेही दु:ख पराभूत करू शकत नाही. अशक्य वाटणारे प्रत्येक काम कठोर परिश्रम आणि जिद्दीने सहज करता येते. वेळ खूप शक्तिशाली आहे, त्याचा दुरुपयोग टाळला पाहिजे. परिणामांच्या भीतीने कष्ट न करणारे लोक आयुष्यात कधीच यशस्वी होत नाहीत, असे ते सांगतात. अडवी यांच्या सल्ल्याने मेनन यांनी ओमानला जाण्याचा धाडसी आणि आव्हानात्मक निर्णय घेतला. खिशात अवघे पन्नास रुपये घेऊन ते ओमानला गेले. तेथे पोहोचल्यानंतर अनेक आव्हानांवर मात करत त्यांनी साडेतीन लाख रुपयांचे कर्ज घेऊन इंटिरिअर डेकोरेशन कंपनी सुरू केली.

पीएनसी मेनन पैशाअभावी स्वत: शिक्षण घेऊ शकले नाहीत; पण त्यांना शिक्षणाचे महत्त्व माहीत होते. आपल्या गावात व परिसरातील एकही मूल आर्थिक विवंचनेमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, हे त्यांचे स्वप्न आहे. त्यामुळेच त्यांनी आपल्या गावात लहान मुलांसाठी आंतरराष्ट्रीय सुविधा असलेली शाळा, सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल आणि पंचतारांकित वृद्धाश्रम बांधले आहेत. या तिन्ही सुविधा एकाच गावात उपलब्ध असून गरिबांना मोफत उपलब्ध आहेत.



# निसर्गरम्य तापोळा



भटकंती

वीकेंडला फिरायला जायचं ठरल्यावर पाचगणी आणि महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणांना अनेकांची पसंती असते. हिरवाईने नटलेली ही दोन्ही ठिकाणं लोकांना आकर्षित करतात. म्हणूनच इथे खूप गर्दी झालेली असते. शहरातल्या धकाधकीपासून लांब जायचं तर हा कलकलाट नको वाटतो. म्हणूनच काही निवांत क्षण अनुभवायचे असतील तर तुम्ही महाबळेश्वरपासून जवळ असलेल्या तापोळ्याला जाऊ शकता. या ठिकाणाला पश्चिम घाटाचं मिनी काश्मिर म्हटलं जातं. यावरूनच इथल्या सौंदर्याची कल्पना येईल.

पुण्यापासून अवघ्या १५० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण असल्याने बाईक किंवा गाडीने प्रवास करता येईल. मित्रमंडळींसोबत बाईकने जाताना खूप मजा येईल. वाटेतलं निसर्गसौंदर्य न्याहाळत, टपरीवरचा चहा पित मस्त भटकंती करता येईल. वॉटर स्पोर्टस हे तापोळ्याचं मुख्य आकर्षण. तुम्हाला यात रस नसेल तर काळजी करू नका. आसपासच्या गावांना भेट द्या. इथल्या वासोटा किल्ल्यावर ट्रेकिंगला जाता येईल. इथे जाण्यासाठी वनाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. कृषी पर्यटनाच्या बऱ्याच सोयी इथे आहेत. तसंच बजेटमधली रिसॉर्टसही उपलब्ध आहेत.

महाबळेश्वरपासून फक्त २५ किलोमीटरवर असलेलं तापोळा खूप सुंदर आहे. इथलं निसर्गसौंदर्य प्रत्येकालाच मंत्रमुग्ध करतं. दोन दिवस मस्त रिलॅक्स होण्यासाठी तुम्ही इथे येऊ शकता. कॉलेजची परीक्षा संपल्यावर भटकंती करायची योजना असेल तर तुमच्या बकेट लिस्टमध्ये तापोळ्याचा समावेश करून ठेवा.


# अरे बापरे! एक चॉकलेटची किंमत नव्वद डॉलर!

लक्षवेधी

व्हॅलेंटाईन वीक सुरू झाला आहे. पहिला दिवस (रोझ डे) गुलाबांच्या वासात गेला. आता वेळ आली आहे 'प्रपोज डे'ची म्हणजेच तुमच्या भावना तुमच्या पार्टनरसोबत शेअर करण्याची. हे सगळे झाल्यावर मग तोंड गोड करणे गरजेचे असते. जोडपे एकमेकांना चॉकलेट भेट देऊन प्रेम शेअर करत असतात. अनेक युवक आपल्या मैत्रिणीसाठी चांगले चॉकलेट कोणते, तिला कोणते आवडेल आणि जास्तीत जास्त चांगले चॉकलेट देऊन इम्प्रेस कसे करता येईल, अशा विचारात असतात. अशा अनेकांना जगातील 'त्या' अतिमहागड्या चॉकलेटची माहिती नसावी. ते विकत घेण्यासाठी श्रीमंत लोकही धडपडत असतात. चॉकलेटच्या या किमतीत घर किंवा महागडी कारही घेऊ शकता!



जगातील सर्वात महाग चॉकलेट शोधत असाल, तर आधी त्याची किंमत जाणून घेणे महत्त्वाचे आहे. इक्वेडोरचे 'टोआक चॉकलेट; इतके महाग आहे की, मुकेश अंबानींसारख्या श्रीमंतांनाही ते विकत घेण्यापुर्वी अनेकदा विचार करावा लागेल. रिपोर्टसनुसार, या चॉकलेटच्या एका बारची किंमत ६८५ डॉलर (सुमारे ६० हजार रुपये) आहे. संपूर्ण चॉकलेटची किंमत आणखी जास्त आहे. या यादीतले दुसरे सर्वात महाग चॉकलेट म्हणजे 'डी ली फी. हा सोन्याचा चॉकलेट बॉक्स आहे. या चॉकलेट बॉक्सची किंमत ५०८ डॉलर आहे. भारतीय रुपयामध्ये त्याची किंमत अंदाजे ४५ हजार रुपये भरु शकते. हे एक स्विस चॉकलेट आहे, ज्याच्या प्रत्येक बॉक्समध्ये गोल्ड प्लेटेड चॉकलेटचे आठ बार असतात. या यादीत अमेठी पोर्सिलाना डार्क चॉकलेट तिसऱ्या क्रमांकावर आहे. हे चॉकलेटही सर्वसामान्यांच्या आवाक्यात नाही. त्याची किंमत सुमारे ९० डॉलर आहे.




# 'एआय' कंपन्या तंत्रज्ञांच्या शोधात

वेगळ्या वाटा

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) हे आजच्या युगातील सर्वात फायदेशीर करिअरपैकी एक आहे. 'एआय' द्वारे, लोक तासभर लागणारे काम काही मिनिटांत पूर्ण करू शकतात. अशा परिस्थितीत, आज मोठ्या कंपन्या 'एआय' ची समज आणि तंत्रज्ञान असलेल्या लोकांच्या शोधात आहेत. त्यामुळे या क्षेत्रात अभ्यास असणाऱ्यांना नोकरीच्या मोठ्या संधी आहेत.

जेव्हा एखादे यंत्र मनुष्यासारखा विचार करून कोणतेही काम करू लागते, तेव्हा त्याला 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणतात. या विषयावर टर्मिनेटर, ब्लेड रनर, स्टार वॉर, मॅट्रिक्स, आय रोबोट असे अनेक हॉलीवूडपट बनले आहेत. या तंत्रज्ञानात यंत्र माणसाचे काम सोपे करते. ही गुणवत्ता जगभरातील अनेक कंपन्यांना आकर्षित करत आहे. 'एआय' चा वापर समस्यांचे निराकरण, नवीन योजना, नवीन कल्पना शोधण्यासाठी केला जाऊ शकतो. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित चॅटबॉट, चॅटजीपीटीचा वापर चर्चेत आहे.

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा अभ्यास करण्यासाठी १२ वीमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित या विषयांसोबतच कॉम्प्युटर सायन्स, आयटी आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयांची पदवी असणे आवश्यक आहे. 'एआय' क्षेत्रात उत्तम करिअर करण्यासाठी संगणक विज्ञान आणि गणिताचे ज्ञान आवश्यक आहे. अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर या क्षेत्रात करिअर करू शकता. ही पदवी कॉम्प्युटर सायन्स, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी, मॅथ्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिकल्स या विषयांमध्ये असावी. काही संस्थांमध्ये, 'एआय' अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षादेखील घेतल्या जातात. पात्रता असणे आवश्यक आहे. संगणक विज्ञान पदवीधर उमेदवारदेखील या क्षेत्रात काम करू शकतात.

बी. टेक., एम. टेक, बीसीए, एमसीएस, बी. एस्सी.(आयटी), एम. एस्सी (आयटी), सॉफ्टवेअर अभियंता/डेव्हलपर्स/वास्तुविशारददेखील आर्टिफिशियल इंटेलिजन्स कोर्स करू शकतात. जर उमेदवाराला ग्रॅज्युएशन दरम्यान सांख्यिकी, संभाव्यता सिद्धांत, रेखीय बीजगणित यासारखे मूलभूत ज्ञान तसेच युनिक्स साधने आणि प्रगत सिग्नल प्रक्रिया तंत्रांची चांगली माहिती असल्यास, तो या क्षेत्रात उच्च स्तरावर पोहोचू शकतो. या क्षेत्रातील शक्यता आणि करिअर वाढीला मर्यादा नाही.

कुठे कराल 'एआय'चा कोर्स ?

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी

चंदीगड विद्यापीठ, चंदीगड

एसआरएम ईश्वरी अभियांत्रिकी महाविद्यालय, चेन्नई

किंग्ज कॉर्नरस्टोन इंटरनॅशनल कॉलेज, चेन्नई


सविता अभियांत्रिकी महाविद्यालय, चेन्नई

इंद्रप्रस्थ इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी), नवी दिल्ली

नोकरीव्यतिरिक्त 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा अभ्यास करण्याचा सर्वात मोठा फायदा पगाराच्या बाबतीत होतो. अभियांत्रिकीच्या इतर शाखांपेक्षा जास्त पगार हे या क्षेत्राचे आकर्षण आहे. भविष्यात प्रत्येक क्षेत्रात 'एआय'तज्ज्ञ दिसतील. 'एआय'चा वापर सर्वत्र उद्योग, डिझायनिंग, अवकाश, अभियांत्रिकी, वैद्यकीय इत्यादी सर्वत्र केला जाईल. 'एआय'मध्ये शिक्षण घेतल्यानंतर, सुरुवातीचे पॅकेज ७० हजार ते १ लाख रुपये प्रति महिना असू शकते, तर पाच ते दहा वर्षांच्या अनुभवानंतर ते दरमहा सुमारे ४ ते ५ लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकते.

# बॅटरीचे आयुष्य वाढवायचेय?

आजकाल लॅपटॉप हा आपल्या दैनंदिन कामाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे; परंतु लॅपटॉप वेगाने डिस्चार्ज होत असेल, तर कामात अडथळा येऊ शकतो. सामान्यतः, नवी लॅपटॉप बॅटरी चार ते सहा तास टिकते; परंतु बॅकअपचे प्रमाण वेळेनुसार कमी होऊ लागते. तथापि, काही सोप्या टिप्स आणि 'सेटिंग्ज'चा अवलंब करून लॅपटॉपच्या बॅटरीचे आयुष्य वाढवता येते.




बॅटरीचा बॅकअप वाढवण्यासाठी स्क्रीन ब्राइटनेस कमी करा. कारण लॅपटॉप स्क्रीन सर्वात जास्त बॅटरी वापरतो. ब्राइटनेस जास्त असल्यास, बॅटरी वेगाने संपते. हे कमी करण्यासाठी विंडोजमध्ये ॲक्शन सेंटर (विंडोज + ए) उघडा आणि ब्राइटनेस ३०-४० टक्क्यांवर सेट करा. एफ १ की दाबून मॅकबुकमधील ब्राइटनेस कमी करा. बॅटरी सेव्हर मोड चालू करा. विंडोज आणि मॅकओसमध्ये बॅटरी सेव्हर मोड प्रदान केला आहे. तो ॲप्सची बॅकग्राउंडमधील हालचाल कमी करुन बॅटरीचे आयुष्य वाढवतो. अनेक वेळा आपण अशी सॉफ्टवेअर आणि ॲप्स उघडी ठेवतो, ज्यांची गरज नसते आणि ते बरीच बॅटरी वापरत राहतात. अशा वेळी विंडोज टास्क मॅनेजर उघडा आणि अनावश्यक प्रक्रिया थांबवा. वापरकर्ते बॅकग्राउंडवर सुरु असलेली ॲप्स बंद करू शकतात. गरज नसताना वाय-फाय आणि ब्लूटूथ बंद करावे. हे बॅटरीचा वापर १०-२० टक्के वाढवू शकतात.

याशिवाय लॅपटॉप गरम होऊ लागल्यास, बॅटरी लवकर संपते. हे टाळण्यासाठी लॅपटॉप सपाट आणि थंड ठिकाणी ठेवावा. कूलिंग पॅड वापरावे. धूळ साचल्यास लॅपटॉपचा पंखा स्वच्छ करुन योग्यरित्या चार्ज करावा. बॅटरी शंभर टक्के चार्ज करू नये तसेच दीर्घकाळ प्लग इन करून ठेवावी. ती २० टक्क्यांपेक्षा कमी असेल तेव्हाच चार्जिंग सुरू करावे. जलद चार्जिंग टाळावे, कारण ते बॅटरीचे आयुष्य कमी करू शकते. लॅपटॉपमध्ये हे छोटे बदल केले तर बॅटरी जास्त काळ टिकेल आणि पुन्हा पुन्हा चार्जिंग करण्याची गरज लागणार नाही.

# व्हॉट्सॲप स्टेटस पहायचे आहे?

टिप्स अँड ट्रिक्स

व्हॉट्स ॲप हे जगातील सर्वात लोकप्रिय मेसेजिंग ॲप आहे. त्यावर दररोज करोडो लोक चॅट करतात, कॉल करतात आणि स्टेटस शेअर करतात. एखाद्याचे व्हॉट्स ॲप स्टेटस पाहिल्यावर समोरच्याला त्याची माहिती मिळते, पण समोरच्याला कळू न देता स्टेटस बघायचे असेल तर व्हॉट्स ॲपचे एक खास सेटिंग मदत करू शकते. हे फीचर चालू करून तुम्ही कोणाचेही स्टेटस गुपचूप (अनसिन मोड) पाहू शकता आणि समोरच्या व्यक्तीला त्याची माहितीही होणार नाही.





एखाद्याचे स्टेटस गुपचूप पहायचे असेल तर फक्त व्हॉट्स ॲपचे 'रीड रिसीप्ट सेटिंग' बंद करावे लागेल. ते बंद केल्यानंतर, तुम्ही कोणाचेही स्टेटस पाहू शकता आणि समोरच्याला त्याची माहिती मिळणार नाही. व्हॉट्स ॲप उघडा आणि वरच्या उजवीकडे असलेल्या तीन-बिंदूंवर क्लिक करा. आता 'सेटिंग्ज' पर्यायावर जा. प्रायव्हसी हा पर्याय सिलेक्ट करा. येथे तुम्हाला 'रीड रिसीप्ट' चा पर्याय दिसेल, तो बंद करा. आता तुम्ही कोणाचेही स्टेटस पाहू शकता आणि समोरच्या व्यक्तीला ते कळणार नाही.

तुम्ही पाठवलेला मेसेज कधी आणि कोणी वाचला हे तुम्हाला कळणार नाही. याचा ग्रुप चॅटवर परिणाम होणार नाही, म्हणजेच ग्रुपमध्ये वाचलेल्या मेसेजची ब्लू टिक नेहमी दिसेल. तुम्ही हे सेटिंग पुन्हा चालू केल्यास, तुमचे स्टेटस व्ह्यू उलट होणार नाही. म्हणजेच तुम्ही आधी पाहिलेल्या स्टेटसची माहिती नंतरही समोरच्या व्यक्तीला उपलब्ध होणार नाही. तुम्हाला 'रीड रिसीप्ट्स' बंद न करता एखाद्याचे स्टेटस पहायचे असल्यास एक युक्ती मार्ग आहे. दुसरी व्यक्ती स्टेटस टाकते, तेव्हा तुमचा फोन 'फ्लाईट मोड'वर ठेवा. आता व्हॉट्स ॲप' उघडा आणि गुपचूप स्टेटस पाहा. स्टेटस पाहिल्यानंतर व्हॉट्स ॲप पूर्णपणे बंद करा आणि नंतर इंटरनेट चालू करा. त्यामुळे समोरच्या व्यक्तीला तुम्ही त्यांचे स्टेटस पाहिले आहे हे कळणार नाही.

# पन्नास वर्षे बॅकअप देणारी बॅटरी!

तंत्रज्ञानातील सतत नवनवीन शोध लोकांची जीवनशैली सुलभ करत आहेत. आता एका चिनी स्टार्टअप कंपनी 'बीटाव्होल्ट' ने बॅटरीबाबत एक धक्कादायक दावा केला आहे. ते म्हणतात, की त्यांनी अशी बॅटरी विकसित केली आहे, जी ५० वर्षांपर्यंत पॉवर बॅकअप देईल. हे बॅटरी तंत्रज्ञान एखाद्या मोठ्या चमत्कारापेक्षा कमी नाही. म्हणजेच बॅटरी पुन्हा पुन्हा चार्ज करण्याची गरज भासणार नाही. हा शोध ऊर्जा साठवणुकीचा मार्ग पूर्णपणे बदलेल.




'बीटाव्होल्ट' म्हणते, की ते या वर्षापासून १वॉट बॅटरीचे उत्पादन सुरू करेल. 'बीटाव्होल्ट' म्हणते, की ते बॅटरी उद्योग पूर्णपणे बदलेल. कॉम्पॅक्ट आकार 'बीटाव्होल्ट'च्या अणुऊर्जा प्रणालीवर आधारित, या बॅटरीचा आकार खूपच कॉम्पॅक्ट आहे. त्याचा आकार १५१५१५ घन मिलिमीटर आहे, जो एका नाण्याएवढा आहे. जरी आकार लहान असला तरी तो ३ वॉटवर १००मेगावॉट ऊर्जा देऊ शकतो. या बॅटरीमध्ये ६३ न्यूक्लियर आइसोटोप कॉम्पॅक्टपणे स्थापित केले आहेत. यासोबतच निकेल-६३ लेयरसह १०-मायक्रॉन जाडीचा डायमंड सेमीकंडक्टरही बॅटरीमध्ये वापरण्यात आला आहे.

# आरोग्यदायी पीनट बटर सँडविच

झटपट रेसिपी

मित्रांनो, हॉस्टेलमध्ये आपल्याला काही तरी झटपट बनवायचं असतं. हाताशी फार वेळ नसतो तसंच भांडीही नसतात. दिवसभराच्या धावपळीमुळे थकवा आल्यानंतर शरीराला पोषक घटकही लागतात. अशा वेळी पीनट बटर बनाना सँडविच हा स्वस्तातला मस्त पर्याय आहे.



साहित्य: ब्रेड, पिनट बटर, केळ्याचे काप. (केळ्याऐवजी स्ट्रॉबेरी किंवा ब्लूबेरीही वापरता येतील.)

कृती: दोन किंवा चार ब्रेड स्लाईस घ्या. चारही स्लाईसच्या एका बाजूला पिनट बटर लावा. आता ब्रेडवर केळ्याचे काप ठेवा. वर दुसरा ब्रेड ठेऊन सँडविच बनवा. आवडत असतील तर ब्रेड टोस्ट करून घ्या. डाळिंब, सफरचंद अशी फळंही घालता येतील. नाश्ता किंवा रात्रीचं जेवण म्हणून तुम्ही हा पदार्थ खाऊ शकता. फळांमधून तुम्हाला भरपूर पोषक घटक मिळतील. तर पिनट बटरही खूप हेल्दी असतं. त्यामुळे अगदी झटपट हेल्दी पदार्थ तयार होतील.

## शिवकालीन शिक्षेची अंमलबजावणी करायला हवी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :



माध्यमांशी संवाद साधताना माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मुलींच्या सुरक्षेसाठी कडक कायद्याची मागणी केली आहे. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीसह तीन मुलींची मुक्ताई नगरच्या यात्रेत छेड काढण्याच्या घटनेचा त्यांनी तीव्र निषेध केला.

मुनगंटीवार म्हणाले, महिलांच्या सुरक्षेसाठी कायद्यातील त्रुटी तपासून त्यात आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. त्यांच्या मते, मुलींना त्रास देणे हा खुनापेक्षाही गंभीर गुन्हा आहे. या विषयावर ते अधिवेशनात अशासकीय विधेयक मांडणार आहेत. विधानसभा अध्यक्षांनी त्यांच्या विनंतीला मान्यता दिली आहे. मुनगंटीवार यांनी 'फिक्सर' अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईची मागणी केली. त्यांनी अशा फिक्सर्सची माहिती देणाऱ्यांना ५० लाख रुपयांचे बक्षीस देण्याचा कायदा करण्याची शिफारस केली. त्यांनी राजकीय नेत्यांना गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींपासून दूर राहण्याचा सल्लाही दिला.

धनंजय मुंडे यांचा राजीनामा दोन दिवसात घेणार की नाही हे मला माहीत नाही. यावर निर्णय घेण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यांच्याकडे गृह खाते आहे. पोलिस विभागाने त्यांना या संदर्भात काही माहिती दिली असेल, याशिवाय कृषी घोटाळ्याच्या आरोपावर कृषी विभागाच्या सचिवांनी त्यांना काही पुरावे दिले असतील तर ते निश्चितच निर्णय घेतील असेही ते म्हणाले. धनंजय मुंडे यांच्यावर होणारे आरोप हे खरे असतील, त्यांचा आणि आरोपी वाल्मिक कराडचा संबंध असेल तर त्यांचा राजीनामा मुख्यमंत्र्यांनी घेणे गरजेचे आहे. आरोप खोटे असतील आणि त्यात काही तथ्य नसल्यास मुख्यमंत्र्यांनी याची माहिती सभागृहात द्यावी लागेल, असेही मुनगंटीवार यांनी सांगितले.

# वि. वा. शिरवाडकरांचे साहित्य भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग

### प्रेमाताई खांडवे यांचे प्रतिपादन : वि. सा. संघातर्फे स्मरण कुसुमाग्रजांचे

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३ :

विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रजांचे साहित्य गंगेप्रमाणेच भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यांचे साहित्य अजरामर आहे. त्यांचे प्रगल्भ विचार त्यांच्या साहित्यातून कळतात. त्यांनी मराठी भाषेला उचित मान्यता मिळावी याकरिता प्रयत्न केला, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका प्रेमाताई खांडवे यांनी केले.

विदर्भ साहित्य संघ ग्रंथसहवासद्वारा कविवर्य वि. वा. शिरवाडकर जयंती आणि मराठी भाषा गौरवदिनाचे औचित्य साधून स्मरण कुसुमाग्रजांचे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध लेखक, कवी सुनील शिनखेडे, प्रमुख वक्ता म्हणून लेखिका प्रेमाताई खांडवे, पर्यावरणतज्ञ शेफाली दुधबडे उपस्थित होत्या.

प्रेमाताई खांडवे म्हणाल्या, माझ्या मराठी भाषेचा लावा ललाटी टिळा असं सांगणाऱ्या कुसुमाग्रजांनी लक्षणीय लेखन केले. विशाखा या काव्यसंग्रहाने त्यांना प्रसिद्धी मिळाली. या काव्यसंग्रहातील कवितांनी राष्ट्रप्रेमाच्या ज्वाळा धगधगल्या. गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार अशा राष्ट्रप्रेम जागृत करणाऱ्या अनेक कविता आजही सर्वांच्या ओठांवर आहेत. कौंतेय, पेशवा, नटसम्राट अशी अनेक नाटके शिरवाडकरांची प्रसिद्ध आहे. वीज म्हणाली धरतीला हे सांगीतिक नाटक अतिशय गाजल्याचे त्यांनी सांगितले.



शेफाली दुधबडे यांनी, विविध भाषांच्या मिश्रणात आपली अभिजात मराठी मागे पडते आहे. प्रत्येक मराठी व्यक्तीने मराठीचा मनापासून स्वीकार करावा. शिरवाडकरांसारख्या मोठ्या साहित्यिकांचे साहित्य युवा पिढीपर्यंत कसे पोहोचेल याचा विचार करावा, असे सांगितले.

समारोपात सुनील शिनखेडे यांनी, सावरकर आणि कुसुमाग्रज या दोघांनीही माय मराठीला खूप काही दिले आहे, असे सांगितले. आज अभिजात मराठीचा दर्जा मिळाला पण ती आधीही होती, आताही आहे. ज्ञानेश्वरी ही आपल्या मराठीचा मानदंड आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मराठी भाषेबद्दल संत तुकारामांनी जे लिहून ठेवले ते आवर्जून वाचायला हवे. भाषा आणि बोली यांचं जतन करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपल्याला मराठी साहित्याने भरभरून दिले आहे, असे ते म्हणाले.

कविता वाचनाच्या कार्यक्रमात डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी, शिरवाडकरांच्या स्वप्नाची समाप्ती, टिळकांच्या पुतळ्याजवळ आणि गर्जा जयजयकार, तर जयश्री अंबासकर यांनी, गाभारा, अहि नकुल आणि प्रेम कर भिल्लासारखं या कविता अतिशय उत्कृष्ट सादर केल्या. प्रा. विवेक अलोणी यांनी, झाड आणि मवाली, नदी या कविता सादर केल्या. नटसम्राट या नाटकातील काही अंश वाचून विनय मोडक यांनी नाट्याविष्काराने उपस्थितांना गणपतराव बेलवलकर या भूमिकेच्या विश्वात नेले.

संचालन वृषाली देशपांडे यांनी, केले तर डॉ. मोनाली पोफरे यांनी आभार मानले. प्रकाश एदलाबादकर, माधुरी वाडीभस्मे आदी उपस्थित होते.

## तांत्रिक अडचणी दूर करून शक्ती कायदा लागू करा

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३ :



माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी शक्ती कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. त्यांनी गृहमंत्री असताना बलात्काराच्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात केली होती. मात्र चार वर्षांनंतरही केंद्र सरकारने या कायद्याला मंजुरी दिलेली नाही.

देशमुख यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, मुख्यमंत्री तांत्रिक अडचणींचे कारण देत आहेत. त्यांच्या मते, या अडचणी असल्यास तज्ज्ञांशी चर्चा करून त्या दूर कराव्यात आणि कायद्यात आवश्यक ते बदल करून तो लागू करावा. देशमुख यांनी प्रशांत कोरटकर प्रकरणावरही भाष्य केले. त्यांनी विचारले की सुरक्षा असतानाही कोरटकर कसा फरार झाला? सरकारकडून त्याला मिळत असलेल्या सहकार्यामागील कारणांबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. सोशल मीडियावर कोरटकरचे भाजप नेत्यांसोबतचे फोटो दिसत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

छत्रपती शाहू महाराज यांनीही या प्रकरणी प्रतिक्रिया दिली. छत्रपती शिवाजी महाराज आणि शंभूराजे यांच्याबद्दल अपमानजनक विधाने करणाऱ्या कोरटकरला आधीच अटक व्हायला हवी होती, असे त्यांनी म्हटले. कोरटकर दुसऱ्या राज्यात पळून गेल्याची माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री ६ तारखेला कोल्हापूरला येत असून त्यावेळी कारवाईची मागणी करण्यात येणार आहे.

# अखेर छत्रपती शिवरायांसमोर कोरटकर नतमस्तक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

इंद्रजीत सावंत यांना धमकी प्रकरणी प्रशांत कोरटकरला जामीन मिळाल्यानंतर कोरटकरचा एक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये तो छत्रपती शिवाजी महाराज यांचे कौतुक करताना दिसून येत आहे.

प्रशांत कोरटकर व्हिडिओत म्हणतोय की, छत्रपतीची राजधानी असलेला रायगडला अनेकदा भेट दिली व नतमस्तक झालो. त्यांना मी मानाचा मुजरा करतो. छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यामुळे महाराष्ट्राला जगभरात ओळखले जाते. त्यांच्या कथा ऐकून लहानाचे मोठा झालो आहे. त्यांच्या कथा अजूनही प्रेरणा देतात.



### न्यायालयाकडून अंतरिम जामीन मंजूर

प्रशांत कोरटकर म्हणतो की, हिंदवी स्वराज्याचे सहसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यामुळे महाराष्ट्राला जगभरात ओळखले जाते. अशा छत्रपती शिवरायांच्या कथा ऐकून आम्ही लहानाचे मोठे झालो. आणि आजही त्यांच्या कहाण्या व कथा अजूनही प्रत्येकाला प्रेरणा देणाऱ्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीत रायगडाला अनेक वेळा भेट देण्याचा योग आला. त्यांच्यासमोर नतमस्तक होण्याचा योग आला. अशा शिवरायांना मी मानाचा मुजरा करतो. जय शिवराय, जय जिजाऊ, जय महाराष्ट्र.

दरम्यान कोरटकरला १ मार्चला कोल्हापूरातील न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला. यामुळे त्याला आता अटकेपासून संरक्षण मिळणार आहे. कोरटकरला न्यायालयाने दिलासा दिला आहे. त्यानंतर त्याचा व्हिडिओ आता समोर आल्याने तो पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी एल्गार मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. ३ :

प्रदेश काँग्रेसच्या निर्देशानुसार आज सोमवारी, राज्यभरात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी एल्गार मोर्चे काढण्यात आले. बुलढाण्यात काढण्यात आलेल्या मोर्चाने काँग्रेसमध्ये उत्साह निर्माण झाला.

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी या मुख्य मागणीसाठी आज बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार मोर्चा काढण्यात आला. सोयाबीन, कापूस, तुरीला हमीभाव नाही.




नाफेड अंतर्गत सुरु असलेली खरेदी सरकार जाणीवपूर्वक संथ गतीने करत आहे. थकलेला पीक विमा, सिंचन अनुदान व यासह शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी एल्गार मोर्चा काढण्यात आला. जयस्तंभ चौकातील गांधी भवन येथून दुपारी सव्वा दोनच्या सुमारास या मोर्चाला प्रारंभ झाला.

## पित्ताशयाचे विकार आणि त्यावरील शस्त्रक्रिया

: हॅलो डॉक्टर :

लोकारोग्य



मानवाला जेजे काही आजार होतात ते त्याच्या शरीराच्या कुठल्या ना कुठल्या अवयवाशी निगडित असतात. अनेकदा आपण अत्यंत रागाने 'माझे पित्त खवळले'असं बोलतो. शरीरातील चयापचयाची प्रक्रिया सुरळीत पणे सुरु राहण्यासाठी हेच पित्त अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडते. शरीरात जे पित्ताशय असते त्यामध्ये पित्त बनण्याची क्रिया होत असते. परंतु अनेकदा आपल्या खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी असतील, अति मसालेदार, तेलकट आणि चमचमीत खाणे असेल, प्रचंड ताण तणाव असेल अशा अनेक कारणामुळे पित्ताशयातील हे पित्त खरोखरच खवळते आणि त्यामुळे अनेक प्रकारचे गंभीर आजार उदभवतात. पित्ताशयाचे हेच आजार आणि त्यावरील शस्त्रक्रिया या विषयाच्या अनुषंगाने मुंबईतील प्रख्यात केईएम इस्पितळात शल्यविशारद असलेले डॉ. समीर रेगे यांच्याशी केलेली बातचीत.

**पित्त म्हणजे नेमकं काया? पित्ताशय म्हणजे काय आणि पित्ताशयाचे कार्य कसे असते?**

■ आपल्या शरीरात यकृताच्या खालच्या बाजूला पित्ताशय असते. शरीरात पित्त म्हणजे पिवळा द्रव लिव्हरमध्ये तयार होतो आणि नंतर मोठ्या आतड्यात जमा होते. यापैकी काही पित्त हे पित्ताशयात जमा होत घट्ट होत. आपण तेलकट, मसालेदार पदार्थांचा आहारात मोठ्या प्रमाणात समावेश केला तर पित्ताशय आकुंचन पावते. आपण नेहमी जो आहार घेतो त्याचे पित्त बनून ते पित्ताशयात येते आणि चयापचय क्रिया सुरळीत काम करते.

**पित्ताशयाशी संबंधित आजार कोणते आहेत?**

■ पित्ताशयाला सूज येणं, पित्ताशय काम करत नाही किंवा पित्ताशयात पित्ताचे खडे बनणं हे पित्ताशयाचे सर्वसामान्य आजार दिसतात. पित्त घट्ट झाल्यामुळे पित्ताशय आकुंचन पावते आणि ते सुरळीत काम करत नाही. पित्ताशयातील हेच खडे जर लहन आतड्यात ढकलले गेले तर कावीळ होण्याचा धोका असतोच, शिवाय या खड्यामुळे स्वादुपिंडाचा त्रास देखील होतो. अनेकदा आपल्या पित्ताशयात खडे झालेले आहेत याची त्या रुग्णाला जाणीव होत नाही त्यामुळेच लक्षण देखील जाणवत नाहीत.

**पित्ताशयाच्या आजाराची कारण काय?**

■ पित्ताशयाचे आजार हे केवळ ठराविक कारणामुळेच होतात असं नाही. खूप जाड असलेली माणसं किंवा अति ताणतणाव यामुळे देखील आजार उद्भवतात. हल्ली तरुणांमध्ये पित्ताशयाचे खडे होण्याचं प्रमाण वाढलेले दिसते तर लहान मुलांमध्ये हिमोलोटिक रक्तपेशींचा आकार बदलल्याने त्याच परिवर्तन खाड्यांमध्ये होते. म्हणूनच साधारण १८ वर्षांच्या आतला रुग्ण जर असेल तर त्याला रक्तदोष तर नाही ना हे पाहूनच त्यावर उपचार केले जातात.

**पित्ताशयाचे खडे काढण्यासाठी जेंव्हा शस्त्रक्रिया करावी लागते तेंव्हा नेमकी पूर्वतयारी काय करावी लागते?**

एकदा रुग्णाची सोनोग्राफी करून त्याच्या पित्ताशयात खडे आहेत हे निष्पन्न झाले कि अर्थात हे खडे लहान आतड्यातील नळीद्वारे खाली सरकले आहेत का याचेही निदान होते. मात्र रुग्णाच्या सिटीस्कॅन द्वारे शरीरातील पित्ताशयातील या खड्यांचे निदान होतच असं नाही. एमआरसीपी नावाची एक टेस्ट आहे जी पित्ताशयामध्ये आणि लिव्हर मध्ये खडे आहेत का? याचे निदान अचूक करणारी टेस्ट आहे. शस्त्रक्रिया करण्यापूर्वी अगदी नॉर्मल ऑपरेशन किंवा एखाद्या क्रिटिकल ऑपरेशन पूर्वी जशा रक्ताच्या,लघवीच्या चाचण्या आणि प्रत्यक्ष शस्त्रक्रियेपूर्वी भूल देण्यासाठीची प्रक्रिया असते.

■ ■ ■

## वितरणातील तफावतीमुळे औषधनिर्माण विकासात अडथळा

आरोग्यनिती

वेक्टर कन्सल्टिंग ग्रुपच्या अलीकडील अहवालात भारतातील औषध वितरणातील एक गंभीर समस्या उघडकीस आली आहे. आघाडीच्या औषध कंपन्यांमध्येही केमिस्टकडे ब्रँड उपलब्धतेमध्ये लक्षणीय तफावत आहे.१८ शहरांमधील ९०० हून अधिक केमिस्ट आणि ६८ स्टॉकिस्ट्सचे सर्वेक्षण केलेल्या या अभ्यासातून असे दिसून आले आहे की केमिस्टकडे औषधनिर्माण कंपन्यांच्या ब्रँडचे कव्हरेज केवळ ६०% ते ८५% आहे, जरी या कंपन्या उच्च इन्व्हेंटरी पातळी राखत आहेत - पुरवठा साखळीत सरासरी १५ आठवडे आणि वितरकांकडे ७ आठवडे. या कमतरतेमुळे १०% ते ६०% प्रकरणांमध्ये केमिस्टकडे निर्धारित ब्रँडची उपलब्धता नसते, जे प्रदेशानुसार बदलते.

देशातील मोठ्या स्टॉकिस्ट्ससोबत काम केल्याने आणि मोठ्या स्टॉकिस्ट्ससोबत काम केल्याने उपलब्धता सुनिश्चित होते, असे गृहीत धरून कंपन्या या गृहीतावर अवलंबून आहेत, परंतु वास्तव खूप वेगळे आहे, असे व्हेक्टर कन्सल्टिंग ग्रुपचे भागीदार चंद्रचूर दत्ता म्हणतात. त्यांना मिळणारी किंमत म्हणजे उत्पादन जुने होणे, कालबाह्य होणे आणि वार्षिक इन्व्हेंटरी राइट-ऑफ, सरासरी ४% ते १०%.

अहवालात असे दिसून आले आहे की केमिस्ट, घाऊक बाजारातून औषधे घेत असले किंवा वितरण-केंद्रित स्टॉकिस्ट असोत, ते सामान्यतः मर्यादित संख्येच्या स्टॉकिस्टसोबत काम करतात. हे स्टॉकिस्ट सहसा कंपनीच्या संपूर्ण उत्पादन श्रेणीला उपचारात्मक क्षेत्रांमध्ये नेण्याऐवजी प्रत्येक कंपनीच्या विशिष्ट उपचारात्मक क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतात. शिवाय, स्टॉकिस्ट मर्यादित संख्येच्या केमिस्टची सेवा करतात - एकतर घाऊक बाजारात भेट देणाऱ्यांना किंवा ज्यांना ते निवडकपणे वितरण-केंद्रित सेटअपमध्ये सेवा देण्यासाठी निवडतात, लॉजिस्टिक आव्हाने आणि क्रेडिट जोखीम विचारांनी मार्गदर्शन करतात. ■

### : आरोग्यम धनसंपदा :

### आरोग्यदाई पपई

आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते. पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ 8.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा. पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते परिवहन भवनचे भूमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

राज्याच्या परिवहन विभागाला अत्याधुनिक सुविधांनी युक्त मुख्यालय मिळावे, या उद्देशाने तब्बल ८५ वर्षांनंतर नव्या परिवहन भवन उभारणीला सुरुवात झाली आहे. या नव्या इमारतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, राज्यातील बॉर्डर चेक पोस्ट बंद करण्यासाठी १५ एप्रिलपर्यंत आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



वरळी, मुंबई येथील सर पोचखानवाला मार्ग येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार मनिषा कायंदे, तसेच परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी व आयुक्त विवेक भीमनवार यांसह मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, परिवहन भवनसाठी चार मजली इमारतीची परवानगी मिळाली असून, पुढील विस्तारासाठी संरक्षण विभागाकडे प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच परिवहन विभागामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा सुरू असून, त्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे बदल्या ऑनलाईन पद्धतीने करण्याचा निर्णय. यामुळे आधीच्या गैरप्रकारांना आळा बसला आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार फेसलेस सेवा मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आल्या असून, आतापर्यंत ४५ हून अधिक सेवा ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. परिवहन विभागाच्या सेवा आणखी सुलभ करण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅप गव्हर्नन्स सुरू करण्यात येणार आहे. याद्वारे ५०० हून अधिक सेवा नागरिकांना घरबसल्या मिळतील. मेट्रोच्या तिकीट सेवेनंतर आता परिवहन विभागाच्या सेवा देखील व्हॉट्सअ‍ॅपद्वारे उपलब्ध होतील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर २९ टक्के आणि समृद्धी महामार्गावर ३५ टक्के अपघातांमध्ये घट झाली आहे. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे त्वरित कारवाई केली जात आहे. त्यामुळे शिस्तबद्ध वाहतुकीला चालना मिळत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## वेतन वाढीसह १६ मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांचा लढा

### ५ मार्चला राज्यभरात निदर्शने

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पगारवाढीसह १६ मागण्यांसाठी आंदोलनाचा मार्ग निवडला आहे. महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या नेतृत्वाखाली ५ मार्चला राज्यभरातील आगारे आणि विभागीय कार्यालयांसमोर निदर्शने होणार आहेत.

शासनाने एसटी कर्मचाऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. पाच महिन्यांपूर्वी जाहीर केलेली पगारवाढ एप्रिल २०२० पासून लागू करण्याचे आश्वासन देऊनही ती एप्रिल २०२४ पासून लागू करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये २०१६-२० च्या एकतर्फी करारातील थकबाकी, २०१८ पासूनचा महागाई भत्ता, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३% नुसार वाढीव महागाई भत्ता यांचा समावेश आहे. याशिवाय करारानुसार ३% वार्षिक वेतनवाढ आणि ८, १६, २४% दराने घरभाडे भत्त्याची थकबाकी देण्याची मागणी आहे.

नागपूर विभागातील सर्व आठ आगारे, विभागीय कार्यशाळा आणि कार्यालयांसमोर निदर्शने होणार आहेत. महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार यांनी शासनाला मागण्या तात्काळ मान्य करण्याचे आवाहन केले असून अन्यथा उग्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# केवळ २० रुपयात महिलांसाठी मेट्रो कार्ड

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३ :

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने महामेट्रोने महिलांना ५०० रुपयाच्या टॉप-अपवर २० रुपयात महाकार्ड देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महिलांना आता स्वस्तात मेट्रोने प्रवास करता येणार आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिवस दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा केला जात असून या विशेष दिवसासाठी महामेट्रोच्या वतीने आठवडाभर महिलांना ही संधी उपलब्ध असेल. ही संधी १ माच ते ८ मार्चपर्यंत सुरु राहील. महाकार्ड हे भारतीय स्टेट बँकसोबत सहकार्याने सुरू करण्यात आले आहे. आतापर्यंत १,०४,८१६ कार्ड विकल्या गेले आहेत. महाकार्ड मेट्रो भाड्यांवर १० टक्के सवलत प्रदान करते.

प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा तसेच आरोग्याचा विचार करता स्पर्शविहीन व्यवस्थापनाकरिता महामेट्रोने स्मार्ट कार्ड आधारित ओपन लूप ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन प्रणाली स्वीकारली आहे आणि ही नागपुरातील सर्व मेट्रो स्थानकांवर लागू करण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून प्रवासी महा कार्डचा उपयोग करून कॅशलेस आणि विनास्पर्श, तसेच सवलतींवर सहज सुलभ प्रवास करू शकतात.



या प्रणालीच्या माध्यमाने प्रवाशांना ट्रेनमध्ये चढताना आणि उतरताना मेट्रो स्टेशनवरील ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन (एएफसी) गेट्सवर फक्त त्यांचे महा कार्ड टॅप करावे लागते आणि त्या माध्यमाने प्रवासी भाडे कार्डमधून कापल्या जाते. महा कार्ड आणि अत्याधुनिक एएफसी प्रणाली पूर्णपणे सुरक्षित आणि पारदर्शक असून जेवढा प्रवास केला असेल तेवढेच भाडे कार्ड मधून वजा केले जाते. ईएमव्ही आधारित स्मार्ट कार्ड ओरिएंटेड ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन सिस्टीम हे प्रवास भाडे भरण्यासाठी उत्तम उपाय आहे. महामेट्रोने प्रवाशांच्या दृष्टीने अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.